**( सभापतीस्थानी - माननीय सभापती )**

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदे मातरम् " या गीताच्या समूह गायनाने झाला .

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे.

विशेष कार्य अधिकारी : महोदय, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत आज, सोमवार, दिनांक 10 मार्च 2008 रोजी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी सभागृहापुढे ठेवतो.

**सभापती** : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : सोबत जोडलेले अभिभाषण येथे छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......बी 2 ...

**पृ.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन.

**मु.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा श्री.सुरेश देशमुख यांचा प्रस्ताव.

श्री. सुरेश देशमुख (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो -

" राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. "

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, श्री.सुरेश देशमुख यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी दुजोरा देते.

**सभापती** : प्रस्ताव असा आहे की :-

" राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

बुधवार, दिनांक 12 व गुरूवार, दिनांक 13 मार्च, 2008 रोजी या प्रस्तावावर चर्चा होईल.

या प्रस्तावास ज्या सदस्यांना सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या मंगळवार, दिनांक 11 मार्च, 2008 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत विधानमंडळ सचिवालयाच्या कक्ष क्र. 017 येथे आणून द्याव्यात.

***

..... बी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2007 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 8 - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) (पुढे चालू राहणे) अध्यादेश, 2007 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : महोदय, सन 2008 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 2 - मुंई मोटार वाहन कर., मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी)., महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर)., विजेच्या विक्रीवरील कर., राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील कर., कर अधिनियम (सुधारणा) आणि रोजगार हमी (सुधारणा)., आणि मुंई राज्य टंचाई निवारण निधी (निरसन) अध्यादेश, 2008 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (पणन राज्यमंत्री) : महोदय, सन 2008 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 1 - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, 2008 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

***

...... बी 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : विधेयकांना संमती व अधिसंमती.

**सभापती** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती / राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधी यादी विशेष कार्य अधिकारी वाचून दाखवतील.

**विशेष कार्य अधिकारी** : **(अ) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली. -**

सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 73 - महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक, 2005.

**(ब) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली. -**

(1) सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 53 - महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2007.

(2) सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 54 - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, 2007.

(3) सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 75 - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, 2007.

(4) सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 76 - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, 2007.

(5) सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 78 - महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक, 2007.

(6) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 28 - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, 2004.

(7) सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 5 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2007.

(8) सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 8 - मुंबईचा सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) (सुधारणा) विधेयक, 2007.

( यानंतर श्री.सरफरे ....सी 1 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पु.शी. : } सभापती तालिका नामनिर्देशित करणे
मु.शी. }

**सभापती** : मी महाराष्ट्र परिषद नियमांतील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो.

(1) श्री. उल्हास पवार

(2) श्रीमती उषाताई दराडे

(3) श्री. जगदीश गुप्ता

(4) श्री. अरविंद सावंत

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

## औचित्याच्या मुद्दयासंबंधी

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, दोन्ही सभागृहातील माननीय सदस्यांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नासंबंधी मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो. आज सकाळी या विधान भवनामध्ये उपस्थित रहाण्याकरिता माझे स्वत:चे वाहन नसल्यामुळे टॅक्सीने आलो. माझ्या नंतर विधानसभेच्या माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि माननीय सदस्य श्री. अरविंद नेरकर हे देखील आले. सभापती महोदय, आपण देखील आला असाल. या सदनातील अनेक माननीय सदस्य आले. त्यावेळी माझ्याप्रमाणेच अनेक माननीय सदस्यांची टॅक्सी विधान भवनाच्या प्रवेशव्दारावर उभी करण्यास पोलिसांतर्फे सांगण्यात आले. तेथील पोलिसांना आम्ही आमच्याकडील ओळखपत्र आणि बॅज दाखविले तरी देखील त्यांनी आम्हाला सुरक्षेच्या कारणास्तव आपल्याला विधान भवनामध्ये टॅक्सी घेऊन जाता येणार नाही असे सांगितले. पोलीस उपायुक्त श्री. रणदे यांना मी सांगितले की, दरवेळी आमची टॅक्सी विधान भवनामध्ये नेता येते. तेव्हा आम्हाला सांगण्यात आले की, आपण याठिकाणी टॅक्सी थांबवून पोलिसांच्या गाडीमधून जावे. सभापती महोदय, आम्ही चोर आहोत काय? आमच्यामुळे या विधान भवनाच्या सुरक्षिततेला धोका आहे काय? सभापती महोदय, याबाबत आम्हाला सांगण्यात आले की, याबाबत माननीय अध्यक्षांचे तसे आदेश आहेत. हा आमदारांच्या दृष्टीने अत्यंत अपमानकारक असा प्रसंग आहे. यावर जवळ जवळ 25 मिनिटे त्यांनी आमच्याशी वाद घातला. शेवटी आम्ही सर्व आमदार जमिनीवर बसलो तरी देखील हा प्रश्न सुटला नाही. त्यानंतर माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब आले व त्यांनी हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. या विधीमंडळामध्ये येणाऱ्या आमदारांना जर अशी वागणूक मिळणार असेल तर ती अत्यंत शोचनीय अशी अवस्था आहे. याबाबत पोलिसांची आमच्याशी इतकी अरेरावी आणि दादागिरी कां ? त्यांना आम्ही सांगितले की, ही माननीय सभापतींच्या अखत्यारीतील गोष्ट आहे. विधीमंडळ हे माननीय सभापतींच्या अधिपत्याखाली येते, याठिकाणी पोलिसांचा अधिकार कधीपासून लागला आहे? आपण याबाबत त्वरीत लक्ष घालून आम्हा सर्व आमदारांना त्वरीत न्याय द्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आज महाराष्ट्रामध्ये पोलिसी राज आला आहे की काय? अशाप्रकारचा संभ्रम निर्माण व्हावा अशाप्रकारची परिस्थिती विधान भवनाबाहेर होती. मी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. मधुकर सरपोतदार....

त्याठिकाणी आलो असतांना संपूर्ण ट्रॅफिक जॅम झाले असल्यामुळे मी पुढे येऊन चौकशी केली. त्यावेळी माझ्या सर्व सहकारी आमदारांनी सांगितले की, आम्हाला पोलिसांनी याठिकाणी टॅक्सीमधून खाली उतरविले आणि इथून विधान भवनाच्या प्रवेशव्दारापर्यंत चालत जावे. मी त्यावेळी त्यांना विचारले की, याबाबत माननीय अध्यक्ष किंवा माननीय सभापती यांनी आपणास आदेश दिले आहेत काय? त्यांनी सांगितले की, तशाप्रकारचा आदेश आम्हाला दिलेला नाही. तरमग पोलिसांनी आम्हाला बाहेर कशासाठी अडविले? हा माझा साधा प्रश्न आहे. आम्ही ज्यावेळी विधान भवनामध्ये येतो त्यावेळी याठिकाणी असलेला संपूर्ण अधिकार सभापती महोदय आपलाच आहे. जर आपण निदेश दिले असतील तर आम्ही ताबडतोब ते मान्य करु. परंतु पोलिसांनी आम्हाला विधान भवनामध्ये प्रवेश करण्यास प्रतिबंध आणून पोलिसांच्या वाहनामधून जाण्यास सांगावे अशाप्रकारचा आमच्यावर अधिकार गाजविण्याची परवानगी त्यांना कुणी दिली? हा माझा पहिलाप्रश्न आहे. जशी पोलिसांना कायदा व सुव्यवस्था कळते त्याप्रमाणे आम्ही देखील कायदा व सुव्यवस्थेला जबाबदार आहोत. या शरामधील कायदा व सुव्यवस्था पाळण्याची जबाबदारी जशी पोलिसांची आहे त्याप्रमाणे ती जनमतेची सुध्दा आहे. जनतेतील प्रत्येक घटकांना जर आपण सकार्य केले तर पोलीस कायदा व सुव्यवस्था संभाळू शकतात. अन्यथा पोलिसांच्या हातामधील ही गोष्ट नाही. हे पोलिसांना आपण अनेक वेळा सांगितले आहे. असे असूनसुध्दा लोकप्रतिनिधींना सभागृहाच्या बाहेर रस्त्यावर थांबण्यास सांगावयाचे आणि तुम्ही टॅक्सी सोडून देऊन चालत जा असे सांगावयाचे हे उचित नाही. ही कारवाई पोलिसांनी कोणत्या नियमाच्या आधारे केली? त्यांना हा अधिकार कुणी दिला? या संदर्भातील खुलासा माध्यमातून या पोलीस अधिकाऱ्यांकडून केला गेला आणि तो जर आम्हाला कळला तर बरे होईल. भविष्य काळात असे प्रसंग पुन्हा उद्‌भवू नयेत या दृष्टीने काळजी घ्यावी. आणि यापुढे कधीही अशाप्रकारची अवमानकारक वागणूक देऊन कोणत्याही सदस्यांचा अपमान होऊ नये एवढीच या औचित्याच्या माध्यमातून मला आपल्याला विनंती करावयाची आहे. धन्यवाद.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/KTG पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:30

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज याठिकाणी ही घटना पहिल्यांदाच घडत आहे असे नाही. मागच्या वेळेला देखील माननीय संसदीय कामकाज मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याशी सुध्दा पोलिसांनी अशाच प्रकारचे वर्तन केले होते आणि त्यावेळी सदनामध्ये तोही विषय मांडण्यात आला होता. खरे म्हणजे विधीमंडळाच्या गेटच्या बाहेर जे दुसरे गेट लावण्यात आलेले आहे, त्या गेटमध्ये पोलिसांशी डायरेक्ट संबंध येतो. विधानसभेच्या व विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांनी आपले ओळखपत्र दाखविल्यानंतर, बॅज दाखविल्यानंतर देखील त्यांना अशा प्रकारची वागणूक देणे हे संयुक्तिक नाही, तो त्यांचा अवमान आहे. म्हणून तेथे जे कोणी उर्मट अधिकारी असतील किंवा ज्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारचे आदेश दिले असतील, त्याची चौकशी करुन त्यांना योग्य ती समज देण्याची गरज आहे. तशा प्रकारची संबंधितांना समज दिली पाहिजे. हे अधिवेशन दीड महिने चालणार आहे. अशा वेळी प्रत्येक दिवशी जर असे प्रसंग उद्भवणार असतील आणि अशा प्रकारे आमदारांचा अवमान होऊ लागला तर तो या सदनाचा अवमान होईल, सदनाची गरिमा राहणार नाही. आमदारांच्या पदाचाही अवमान होईल. म्हणून आपण स्वत: यामध्ये लक्ष घालून याबाबतीत निर्देश देण्याची गरज आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एक मुद्दा उपस्थित केला आहे. पण अशा वेळी दोष कोणाला द्यावयाचा असा माझ्यापुढे प्रश्न निर्माण झालेला आहे. पोलीस आपले कर्तव्य करीत असताना त्यांना सहकार्य केले पाहिजे. आज विधीमंडळाचे अधिवेशन सुरु झाले असताना सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पोलीस आमदारांकडे संशयाने का पाहतात ? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. या सभागृहामध्ये आमचे माननीय नेते, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील येथे उपस्थित आहेत. माझ्या मनामध्ये एक संशय निर्माण झाला म्हणून मी येथे बोलण्यासाठी उभा राहिलो आहे आणि ते होते म्हणून असे होत आहे. आमदार निवासमध्ये अतिरेकी राहून गेले हे सदनामध्ये मान्य केलेले आहे. म्हणून आम्ही असा आग्रह धरला होता की, ते अतिरेकी कोण होते ? ते कोणाच्या खोलीमध्ये राहिले होते ? याची माहिती द्यावी. पण त्यामुळे याबाबतीतील संशयाची पाल सर्व आमदारांकडे जाऊ लागली आहे. तेव्हा असे जे विवक्षित ठराविक आमदार असतील, त्यासंदर्भात जर खुलासा झाला तर बरे होईल. अशा प्रकारचा खुलासा करण्यात यावा अशी मागणी मी मागील अनेक अधिवेशनापासून करीत आहे. परंतु तशा प्रकारचा खुलासा होत नसल्यामुळे सर्व आमदारांकडे संशयाने पाहिले जात आहे.म्हणून सुरक्षेच्या दृष्टीने विधीमंडळ

. . . .डी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

महत्वाचे आहे आणि पोलिसांनी आपले कर्तव्य केले पाहिजे. पण सरकारच्या या कृतीमुळे त्यांचा आमदारांकडे पाहण्याचा जो दृष्टीकोन निर्माण झालेला आहे, त्याबाबतीत मी त्यांना दोष द्यावयाचा काय ? असा माझ्यापुढे प्रश्न निर्माण झालेला आहे. कोणत्याही परिस्थितीत मी मेलो तरी देशद्रोह करणार नाही अशा प्रकारची माझी भूमिका असल्यामुळे मला या कृतीमुळे अपमानित झाल्यासारखे वाटते. कारण काहीही झाले तरी माझ्याकडून कोणत्या प्रकारचा धोका आहे ? असा मुद्दा आहे. म्हणून यानिमित्ताने जो प्रश्न निर्माण झाला आहे, त्याबाबतीत मी पोलिसांना दोष देणार नाही. कारण त्यांनी कोणाकडे पहावयाचे ? पण संबंधितांची नावे बाहेर येत नाहीत, ती त्यांच्या दप्तरी असतील. तेव्हा याबाबतीत खुलासा झाला तर संबंधित विवक्षित आमदार त्यांच्या डोळयापुढे राहतील आणि बाकीच्या आमदारांच्या राष्ट्रप्रेमाबद्दल कधी शंका निर्माण होणार नाही. त्यामुळे पोलिसांना दोष कसा द्यावयाचा ? असा प्रश्न निर्माण होत आहे. म्हणून याबाबतीत माहिती द्यावी अशी मी आपल्या माध्यमातून माननीय गृहमंत्र्यांना विनंती करतो. धन्यवाद.

श्री.उल्हास पवार : अध्यक्ष महाराज, याठिकाणी एक महत्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. परंतु या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मुद्दा मांडत असताना सांगितले की, आमदारांचा अपमान होऊ नये याची काळजी पोलिसांनी घेतली पाहिजे, सर्वांनी घेतली पाहिजे. तसेच सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनीही घेतली पाहिजे. पण सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पाहता जेव्हा संसदेवर अशा प्रकारचा हल्ला करण्यात आला, तेव्हा संबंधितांनी खोटी गाडी वापरुन, खाजगी गाडी वापरुन हल्ला करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच 1992 मध्ये किंवा त्यानंतर मुंबईमध्ये विविध ठिकाणी झालेले बॉम्बस्फोट हे रेल्वेमध्ये किंवा खाजगी गाडयांमध्ये, स्कुटरमध्ये बॉम्ब ठेऊन झ ालेले आहेत. हे सर्व पाहिल्यानंतर, आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे पोलिसांची परिस्थिती अत्यंत अवघड झालेली आहे. त्यांनी सन्माननीय सदस्यांचा अवमान केला, त्याबद्दल त्यांना जाब विचारला पाहिजे. मला माफ करा, माझी कोणालाही दुखविण्याची इच्छा नाही. मी सर्वांचा आदर करतो. ज्या-ज्या सन्माननीय सदस्यांनी म्हणजे माननीय आदरणीय, सर्वात ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदारदादा, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अशी भावना व्यक्त केली की, आमदारांचा अपमान होऊ नये आणि त्याच्याशी मी सहमत आहे. परंतु गाडी किंवा टॅक्सी आतमध्ये आणण्याचा अट्टाहास केला किंवा ....

. . . .डी-3



APR/SBT/KTG 14:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आग्रह केला तर त्या पोलिसांची कुचंबणा होते. समजा उद्या काही . . . .

डॉ.दीपक सावंत : मग आमदारांनी चालत यावे असे सांगितले पाहिजे.

श्री.उल्हास पवार : अध्यक्ष महाराज, माझी भावना लक्षात घ्यावी. आमदारांचा अपमान होता कामा नये. पण टॅक्सी आतपर्यंत आणण्याचा आग्रह धरणे, कारण दुर्दैवाने मुंबईमध्ये टॅक्सीतूनच बॉम्बस्फोट घडलेले आहेत हे मला यानिमित्ताने अत्यंत विनम्रपणे या सदनाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे, बाकी मला काही म्हणावयाचे नाही.

श्री.आर.आर.पाटील : अध्यक्ष महाराज, पोलीस खाते विधान भवनाची सर्व सुरक्षा ही आपल्या नियंत्रणाखाली ठेवत असते. सुरक्षा यंत्रणा किती असावी ? कशी असावी ? यातील वेगवेगळे इम्पुट लक्षात घेऊन, त्याची आपल्याला पूर्व कल्पना देऊन, आपल्या निदेशाप्रमाणेच ही व्यवस्था केली जाते. कुठेही सुरक्षा व्यवस्था ठेवली तरी सुरक्षिततेबरोबरच काही गैरसोयी स्विकाराव्या लागतात. आज विमानामधून प्रवास करताना आपले सर्व 100 टक्के चेकींग होत असते. पण तसेच जर सचिवालयामध्ये करण्याचा प्रयत्न केला तर अपमान वाटण्यास सुरुवात होते. सभापती महोदय, चेकींग करुन घेणे किंवा पोलिसांनी सर्व रेकॉर्ड पहाणे . . . .

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : चेकींगला विरोध नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील: एका वेळी सगळया गाडया यावयास लागल्या तर 100 टक्के फ्रिस्किंग शक्य होत नाही. तसेच 100 टक्के चेकिंग करणेसुध्द शक्य होत नाही. त्यामुळे तेथे वाहतूक ब्लॉक होण्याची शक्यता असते. ही सगळी परिस्थिती लक्षात घेऊन सन्माननीय सदस्यांना पोलिसांच्या गाडया नको असतील तर गेटवर शासनामार्फत दुस-या गाडया-ॲबॅसिडर्स ठेवल्या जातील. बाहेरच्या गेटवरुन विधानभवनाच्या गेटपर्यंत ज्या सदस्यांना चालत यावयाचे असेल ते सदस्य चालत येतील आणि ज्या सदस्यांना गाडीने यावयाचे असेल त्या सदस्यांसाठी बाहेरच्या गेटवर शासनाच्या वेगळया गाडया निश्चितपणे ठेवण्यात येतील. पण सुरक्षिततेच्या बाबबतीत सर्व सन्माननीय सदस्यांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी सभागृहात येत असताना बाहेरच्या गेटवर जी वागणूक दिली जाते त्यासंदर्भात या सभागृहात कोणाचेही दुमत होणार नाही. त्या ठिकाणी देण्यात येणारी वागणूक सन्मानाची असली पाहिजे, आदराची असली पाहिजे आणि योग्य रीतीची असली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या मताशी मी सहमत आहे. या बाबतीत पोलिसांना दुषण देता येणार नाही. कारण या परिसरामध्ये माननीय सभापतींच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही होत असते. माझ्या माहितीप्रमाणे सन्माननीय सदस्यांसाठी जी बसची व्यवस्था आहे, ती बस सन्माननीय सदस्यांना विधानभवनाच्या गेटपर्यंत आणून सोडते. पण टॅक्सीच्या बाबतीत मी स्वत: अनुभवलेले आहे. विधान भवनाच्या गेट व्यतिरिक्त बाहेर जो एक गेट तयार करण्यात आलेला आहे तेथे उतल्यानंतर तेथे दुस-या गाडया लावलेल्या असतात. या गाडया पोलिसांच्या असाव्यात की, त्या गाडयांवर "विधान भवन" असा बोर्ड असावा की, शासनाचा बोर्ड असावा हा वेगळा भाग आहे. पण त्या ठिकाणी करण्यात येणा-या तपासणीमध्ये वेळ जातो. ती व्यवस्था चुकीची आहे असे मला व्यक्तिश: वाटत नाही. शिवाय तो एक मानण्याचा भाग आहे. ती टॅक्सी खालूनवरपर्यंत डिक्कीसह तपासणे हे अवमानास्पद की, सन्माननीय सदस्यांनी बाहेरच्या गेटवर उतरुन वेळ न घालवता त्याठिकाणी असलेल्या गाडीत बसून येणे हे अवमानास्पद हा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख।..

मानण्याचा भाग आहे. मला असे वाटते की, याबाबतीत सर्व गट नेत्यांशी चर्चा करुन या व्यवस्थेमध्ये स्थिरता आणण्याची आवश्यकता आहे. शेवटी कोणती व्यवस्था सन्मानपूर्वक आहे हा महत्वाचा भाग आहे. सन्माननीय सदस्यांसाठी बसची व्यवस्था केलेली आहे तसेच टॅक्सीने आल्यानंतर बाहेरच्या गेटवर टॅक्सी सोडल्यानंतर तेथून दुसरी गाडीची व्यवस्था केलेली आहे. (अडथळा) पार्लमेंटमध्ये अशी व्यवस्था आहे. यामध्ये पोलिसांच्या बाबतीतील मुद्दा गौण आहे. पण याबाबतीतील व्यवस्था स्थिर करण्यात यावी, अशी माझी सूचना आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, गट नेते श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख या सर्व ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या सभागृहाचे सन्माननीय नेते आणि गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी सुध्दा याबाबतीत भाष्य केलेले आहे. एक गोष्ट नक्की आहे की, या सदनाच्या सर्व सदस्यांची प्रतिष्ठा ज्यामुळे राखता येईल, त्या पध्दतीने ते या ठिकाणी कसे येतील, याची काळजी विधिमंडळ सचिवालयाच्या माध्यमातून सभापती आणि अध्यक्ष या दोघांनीही घेण्याची आवश्यकता आहे. आज सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील, सन्माननीय विधानसभा अध्यक्ष आणि मी स्वत: एका दुस-या विषयाच्या संदर्भातील बैठकीच्या निमित्ताने एकत्र बसणार आहोत. त्यावेळी या विषयाच्या बाबतीत जरुर चर्चा करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांची प्रतिष्ठा राखली गेली पाहिजे. विधिमंडळाच्या सुरक्षा व्यवस्थेच्या बाबबतीत आपण सर्वच जण काळजी घेतो. सर्वसामान्यपणे ज्यावेळेला सन्माननीय सदस्यांचे खाजगी वाहन असते त्यावेळी त्यांच्या ड्रायव्हर्सना पास देण्यात येतो. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या गाडया आतपर्यंत सोडण्यात येतात. परंतु टॅक्सीच्या अनुषंगाने जी व्यक्ती ड्रायव्हर असेल त्या ड्रायव्हरच्या बाबतीतील संपूर्ण माहिती त्या टॅक्सीमधून येणा-या सन्माननीय सदस्यांना असण्याची किंवा अन्य कोणालाही असण्याची शक्यता नाही. या ठिकाणी सूचना करण्यात आली त्याप्रमाणे बाहेरच्या गेटवर पोलिसांच्या गाडया ठेवण्यात येणार नाहीत पण

..3..

**सभापती** .. . . .

विधिमंडळाच्या किंवा अन्य कोणत्या तरी वाहनामधून सदस्यांना तातडीने आत आणता येईल या बाबतची व्यवस्था निश्चितपणे करण्यात येईल. सन्माननीय गट नेते श्री. मधुकर सरपोतदार यांनी या घटनेच्या संदर्भात मला फोनवरुन माहिती दिली होती. तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी देखील हे सभागृह सुरु होण्याआधी या घटनेसंबंधीची माहिती दिली होती. मी याबाबतची नोंद घेत आहे. तसेच या बाबतीत जी कार्यवाही करण्यात येईल त्याबाबतची माहिती उद्या सदनाला देण्यात येईल.

----

यानंतर श्री. बरवड. . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शोक प्रस्ताव

**मु. शी.** : श्री. बाबा आमटे, थोर समाजसेवक, श्री. रामराव ज्ञानोबा जगताप-आवरगांवकर, माजी वि. प. स. व श्री. य. दि. फडके, ज्येष्ठ साहित्यिक यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव तसेच दिनांक 20 जानेवारी, 2008 रोजी मुंबईतील यात्रेकरुंच्या बसला वणी (जि. नाशिक) येथे झालेल्या भीषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींबद्दल शोक प्रस्ताव.

श्री. आर. आर. पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री. बाबा आमटे, थोर समाजसेवक, श्री. रामराव ज्ञानोबा जगताप-आवरगांवकर, माजी वि. प. स. व श्री. य. दि. फडके, ज्येष्ठ साहित्यिक यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो

" श्री. बाबा आमटे, थोर समाजसेवक, श्री. रामराव ज्ञानोबा जगताप-आवरगांवकर, माजी वि. प. स. व श्री. य. दि. फडके, ज्येष्ठ साहित्यिक यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना कल्पना आहे की, दिनांक 20 जानेवारी, 2008 रोजी मुंबईतील यात्रेकरुंच्या बसला वणी (जि. नाशिक) येथे झालेल्या भीषण अपघातात 40 भाविकांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना अतिशय दु:खद आहे. या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांनाही आधार देणे आवश्यक आहे. या उत्कट भावनांच्या पार्श्वभूमीवर मी आपल्या सभागृहाच्या वतीने या आपत्तीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींबद्दल पुढील शोक प्रस्ताव प्रस्तुत करीत आहे.

" दिनांक 20 जानेवारी, 2008 रोजी मुंबईतील यात्रेकरुंच्या बसला वणी (जि. नाशिक) येथे झालेल्या भीषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करीत आहे."

या दोन्ही शोक प्रस्तावांवर सभागृहाने भावना व्यक्त कराव्यात.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, थोर समाजसेवक कै. मुरलीधर देवीदास उर्फ बाबा आमटे यांचा जन्म 26 डिसेंबर, 1914 रोजी वर्धा जिल्ह्यात, हिंगणघाट येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., एलएल.बी. पर्यंत झाले होते. तसेच कोलकाता येथील "ट्रॉपिकल स्कूल ऑफ मेडिसिन" या संस्थेतून कुष्ठरोगाचा शास्त्रशुध्द अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला होता.

कै. बाबा आमटे यांनी 1942 साली भारत छोडो आंदोलनात भाग घेतल्यामुळे त्यांना कारावासही झाला होता. सुरुवातीला काही काळ त्यांनी वकिली केली होती. तसेच त्यांनी वरोरा नगरपालिकेचे उपाध्यक्ष, सफाई कामगार संघटनेचे अध्यक्ष, म्हणूनही कार्य केले होते. महारोगी सेवा समितीचे संस्थापक-सचिव, महात्मा गांधी मेमोरिअल लेप्रेसी फाऊंडेशन व नॅशनल लेप्रसी ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष, नागपूर विद्यापीठ सिनेटचे तसेच पिपल्स ॲक्शन फॉर डेव्हलपमेंटचे सदस्य, आरोग्य व शिक्षण केंद्रीय मंत्रालयाचे सल्लागार अशी अनेक पदे त्यांनी भूषविली होती.

कै. बाबा आमटे यांची महात्मा गांधी, रविंद्रनाथ टागोर, विनोबा भावे, साने गुरुजी ही श्रध्दास्थाने होती. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी त्यांच्या कार्याबद्दल त्यांना "अभय साधक" ही पदवी दिली होती. "वंचिताबद्दल अन व्याधितांबद्दल मनात केवळ करुणा असणे उपयोगाचे नाही, तर व्याधी दूर करण्यासाठी करुणेस प्रवृत्त करणे" सत्यासाठी आग्रह, दीनदुबळ्यांची सेवा, त्यासाठी संघर्ष ही मूल्ये जपत त्यांच्यासाठीच "आपलं आयुष्य" म्हणवणाऱ्या बाबांच्या जीवनात योगायोगाने आत्मसन्मान जागवणारा एक क्षण आला, तो म्हणजे एका पावसाळी रात्री रस्त्याच्या कडेला भिजून चिंब झालेली महारोगाने जर्जर झालेली व्यक्ती त्यांना दिसली तेंव्हापासून अशा रुग्णांची सेवा करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली अन् त्यामुळे त्यांच्या आयुष्याचा मार्गच बदलून गेला. हा मार्ग होता सेवाभावी वृत्तीचा, या मार्गावरील पहिला मैलाचा दगड म्हणजे चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील "आनंदवन" या संस्थेची निर्मिती. समाजाने दूर केलेल्या कुष्ठरोग्यांना त्यांनी जवळ केले. त्यांना प्रेम दिले, त्यांच्यात जगण्याची जिद्द निर्माण केली, त्यांचा आत्मविश्वास वाढविला, त्यांना श्रमाचा मंत्र दिला व स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी आर्थिक बळ मिळावे तसेच त्यांच्यावर औषधोपचार करुन त्यांचे पुनर्वसन व्हावे यासाठी आनंदवनाच्या रुपाने एक नवे जग उभारुन दाखविले. सन 1951 मध्ये सुरु केलेल्या आनंदवन प्रकल्पाचे आज वटवृक्षात रुपांतर झाले. आदिवासी विभागातील कुष्ठरोग्यांसाठी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/ MMP/

श्री. आर. आर. पाटील .....

अशोकवन (नागपूर), सोमनाथ (चंद्रपूर), हेमलकसा व नागेपल्ली (गडचिरोली) हे प्रकल्प त्यांनी सुरु करुन त्याठिकाणी अंध व कर्णबधीरांसाठी शाळा, अनाथालये, वृद्धाश्रम, वनप्रकल्प, वैद्यकीय प्रशिक्षण, पर्यावरण संरक्षण, रेशीम उत्पादन, कृषी उत्पादन, कुक्कुटपालन व कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालये सुरु करुन दीनदुबळे व पीडितांच्या बरोबर कुष्ठरुग्णांच्या जीवनातील चैतन्याचा झरा बनून त्यांना ताठ मानेने समाजात पुन्हा उभे करण्यासाठी त्यांनी आपल्या कर्तव्यपथावर एका कर्मवीर योध्याप्रमाणे अथकपणे थोर समाजसेवेचे कार्य केले.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

कै. बाबा आमटे यांनी समाजातील उपेक्षित घटक व कुष्ठरोगी यांच्यासाठी केलेल्या या जागतिक किर्तीच्या महान कार्याबद्दल त्यांना सन 1983 मध्ये कुष्ठसेवेचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च असणारा "डेमियन उद्दन (यु.एस.ए.) पुरस्कार", सन 1995 मध्ये आशिया खंडातील नोबेल पुरस्काराच्या दर्जाचा समाजसेवेसाठीचा "मॅगेसेसे अॅवॉर्ड" देण्यात आला. भारत सरकारने सन 1971 मध्ये "पद्मश्री" व 1986 मध्ये "पद्मविभूषण" या पद्मपुरस्काराने गौरविले होते. त्याचप्रमाणे मानवसेवेसाठीचा "जे.डी.बिर्ला इंटरनॅशनल अॅवॉर्ड", "हयुमन राईटस् अॅवॉर्ड" "अपंग कल्याण पुरस्कार", "महात्मा गांधी शांतता पुरस्कार", "डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार", "पद्मगंधा पुरस्कार", "राष्ट्रभूषण पुरस्कार", "जमनालाल बजाज पुरस्कार", "इंदिरा गांधी स्मृती पुरस्कार", "राजाराम मोहन रॉय पुरस्कार", "राष्ट्रीय नागरिक पुरस्कार" अशा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले होते. तसेच पुणे, नागपूर व अकोला या विद्यापीठाने कुष्ठरोगी मानवतेच्या कार्याबद्दल त्यांनी केलेल्या अभ्यासात्मक लिखाणास "डी.लिट" पदवी देवून त्यांचा सन्मान केला होता.

कै.बाबा आमटे हे सेवाभावी वृत्तीचे काम करणारे एक समाजसेवकच नव्हते तर ते एक संवेदनक्षम कवी व लेखक म्हणूनही ज्ञात होते. "ज्वाला आणि फुले", "उज्ज्वल उद्यासाठी", "करुणेचा गुलाम" हे कविता संग्रह तसेच "वर्कर्स युनिव्हर्सिटी", "सार्वजनिक संस्थांचे संचालन", "माती जागवील त्याला मत : एका मतदाराचा जाहीरनामा" ही त्यांची पुस्तके प्रसिध्द आहेत.

कै.बाबा आमटे हे एक असामान्य व्यक्तिमत्व होते. कुष्ठरोग्यांची सेवा करीत असताना त्यांनी पर्यावरण संरक्षण, राष्ट्रीय एकात्मता, हुंडाविरोधी चळवळी, नर्मदा प्रकल्पग्रस्तांच्या न्याय हक्कासाठी लढा इत्यादी आंदोलनांचे नेतृत्वही केले. एवढेच नव्हे तर त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रचारासाठी सन 1985 मध्ये कन्याकुमारी ते काश्मीर असा पाच हजार कि.मी. व इटानगर (गुजरात) ते ओरवा (अरुणाचल प्रदेश) आठ हजार कि.मी. अशा प्रदीर्घ "भारत जोडो" यात्रांचे आयोजन करुन राष्ट्रीय एकात्मता व जन जागृतीचे काम केले. तसेच पंजाब हिंसात्मकतेला बळी पडत असताना शीख जनतेच्या भावनांवर फुंकर घालून त्यांच्या मनात विश्वास निर्माण करुन त्यांना

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/ MMP/

श्री.आर.आर.पाटील....

राष्ट्रीय प्रवाहात सहभागी करुन घेण्याचे महान कार्य त्यांनी केले. ते राष्ट्रीय एकात्मतेचे खंदे पुरस्कर्ते होते.

कुष्ठरोग्यांच्या बहिष्कृत जीवनात स्वाभिमानाचे स्फुल्लिंग चेतविणाऱ्या, उपेक्षितांचे आधारवड असलेल्या व त्यांना मायेचा ओलावा देणाऱ्या मूर्तिमंत आविष्कार असलेल्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या या थोर महामानवाचे शनिवार, दिनांक 9 फेब्रुवारी 2008 रोजी दु:खद निधन झाले.

कै. रामराव ज्ञानोबा जगताप-आवरगांवकर यांचा जन्म 3 ऑगस्ट 1929 रोजी बीड जिल्ह्यात आवरगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रिक पर्यंत झाले होते.

कै. आवरगांवकर यांनी विद्यार्थीदशेतच स्वातंत्र्य संग्रामात सक्रीय सहभाग घेतला होता. 1946 मध्ये हैद्राबाद मुक्ती संग्रामातील तसेच गोवा मुक्ती संग्रामातील व संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील सक्रीय सहभागामुळे त्यांना कारावासही झाला होता.

कै. आवरगांवकर यांनी 1946-48 पिपल्स डेमोक्रॅटिक पक्षाचे व 1948-54 कम्युनिस्ट पक्षाचे तर 1959 पासून कॉंग्रेस पक्षाचे भरीव कार्य केले. मराठवाडा शिक्षण संस्थेचे संस्थापक, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष, बीड जिल्हा होमगार्डचे कमांडर, बीड जिल्हा किसानसभेचे व जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समितीचे अध्यक्ष, "बीड समाचार" या पाक्षिकाचे संपादक, एस.टी. महामंडळाचे तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे सदस्य व राज्य तमाशा महोत्सव समितीचे तसेच बीड जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले होते.

कै. आवरगांवकर 1952 मध्ये गेवराई मतदार संघातून हैद्राबाद विधानसभेवर निर्वाचित झाले होते तर राज्यपुनर्रचनेनंतर 1956 मध्ये तत्कालीन मुंबई राज्य विधानसभेचे ते सदस्य होते. 1964 मध्ये बीड-उस्मानाबाद स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातून विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. तसेच 1974 मध्ये राज्यसभेवरही ते निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे गुरुवार दिनांक 7 फेब्रुवारी 2008 रोजी दु:खद निधन झाले.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 14:50

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु....)

थोर साहित्यिक, सापेक्षी संशोधक, महाराष्ट्राच्या आधुनिक कालखंडाचे इतिहासकार, चरित्रलेखक, ज्येष्ठ विचारवंत यशवंत दिनकर फडके यांचा जन्म 3 जानेवारी 1931 रोजी सोलापूर येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., पी.एचडी. पर्यंत झाले होते.

कै. फडके यांनी विद्यार्थीदशेत असतानाच लेखनास सुरुवात केली. साहित्य, संगीत, नाटक, चित्रपट यात विलक्षण रस असलेल्या साहित्यकारास जबरदस्त प्रतिभेचे वरदान लाभले होते.

कै. फडके यांनी 1966 ते 1980 या काळात मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात अधिव्याख्याते आणि त्यानंतर प्रपाठक म्हणूनही काम केले होते. 1980 ते 1984 पुणे विद्यापीठाच्या महात्मा गांधी अध्यासनाचे प्राध्यापक होते, तर 1984 ते 1991 मध्ये टाटा समाजविज्ञान संस्थेत सामाजिक शास्त्र या विषयाचे प्राध्यापक म्हणूनही त्यांनी काम केले. त्यांची ती कारकींद विशेष गाजली होती. त्यामुळे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्यांची प्रतिमा झाली होती.

कै. फडके यांच्या लिखाणामुळे मराठी साहित्याला एक आगळी वेगळी उंची प्राप्त झाली. मराठी भाषेच्या व ग्रंथसंपदेच्या संवर्धनासाठी त्यांची अखेरपर्यंत धडपड सुरु होती. बेळगांव येथे 2000 मध्ये भरलेल्या 73 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असताना महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासाठी तमाम मराठी साहित्यिकांनी एकत्र येऊन लढावे असे कळकळीचे आवाहन त्यांनी आपल्या भाषणात केले होते. त्यामुळे बेळगावचे साहित्य संमेलन "सीमाप्रश्नमय" साहित्य संमेलन म्हणून गाजले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचा इतिहास त्यांनी ग्रंथरुपाने लिहून ठेवला आहे. "विसाव्या शतकातील महाराष्ट्र" या विषयावरील पुस्तकांचे आठ खंड लिहिणारे आणि इतिहासाच्या अनेक पैलूवर संशोधनवृतीने प्रकाश टाकणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

कै. फडके यांना कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्चकडून 1991 ते 93 या कालावधीसाठी डॉ.आंबेडकर राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळाली होती. त्यांनी लिहिलेल्या "व्यक्ती आणि विचार", "केशवराव जेधे", "लोकमान्य टिळक आणि क्रांतिकारक", "शाहू छत्रपती आणि





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लोकमान्य" या पुस्तकांना राज्य शासनाचे पुरस्कार मिळाले होते. त्याचप्रमाणे "आंबेडकरी चळवळी" या ग्रंथासाठी त्यांना भैरू रतन दमाणी पुरस्कार मिळाला होता. कै. फडके यांनी "संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि कॉंग्रेस पक्ष" ह्या विषयावर लिहिलेल्या प्रबंधास मुंबई विद्यापीठाने पी.एचडी. पदवी दिली होती.

कै. फडके यांनी समाजशास्त्र, अर्थशास्त्र, कायदा, इतिहास, राजकारण इत्यादी विषयावर जवळ जवळ 70 हून अधिक पुस्तके लिहिली असून त्यातील गाजलेली पुस्तके उदा. "महाराष्ट्रातील समाजसुधारक", "व्यक्ती आणि विचार", "दृष्टादृष्ट", "लोकसभा निवडणुका 1952 ते 1999", "जम्मू-कश्मीर स्वायतता की स्वातंत्र्य", "पक्षांतराचे राजकारण", "पुरस्कारांचे राजकारण", "माहितीचा अधिकार", "भारतीय नागरिकत्व", "समान नागरी कायदा", "संसद तेव्हा आणि आता", "नथुरामायण", "व्यक्ती रेखा", "कहाणी सुभाषचंद्राची", "शोध सावरकराचा", "सेनापती बापट", "गोपाळ गणेश आगरकर", "विष्णुशास्त्री चिपळुणकर", "डॉ. आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह", डॉ.आंबेडकर आणि इंडियन नॅशनल कॉंग्रेस, "महात्मा फुले गौरवग्रंथ" तसेच "आंबेडकरी चळवळ", "शोध बाळगोपाळांचा", "र.धो.कर्वे", "केशवराव जेधे", अण्णासाहेब लठ्ठे इत्यादी त्यांनी लिहिलेली चरित्रे पहाता एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते स्वातंत्र्य प्राप्ती पर्यंतच्या कालखंडावर त्यांनी लक्ष केंद्रीत केले असल्याचे दिसून येते. त्यांच्या लिखाणामुळे मराठी साहित्य समृध्द झाले आहे. "शाहू छत्रपती आणि लोकमान्य" या पुस्तकावरुन "अग्निदिव्य" हे नाटक त्यांनी लिहिले. य.दि.फडके यांच्या सिध्दहस्त लेखणीतून तयार झालेली ग्रंथसंपदा म्हणजे महाराष्ट्राचा एक अमूल्य ठेवा आहे.

मराठी साहित्यात आपल्या कर्तृत्वाने स्वत:चे एक आगळे वेगळे स्थान निर्माण करुन महाराष्ट्राचा चालताबोलता सामाजिक व राजकीय ज्ञानकोश म्हणून समाजजीवनाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरलेल्या सरस्वतीच्या उपासकाचे शुक्रवार, दिनांक 11 जानेवारी 2008 रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील....)

सभापती महोदय, दिनांक 20 जानेवारी 2008 रोजी नाशिक जिल्हयातील वणी येथे अतिशय दु:खद घटना घडली. त्यामध्ये 40 भाविक मृत आणि अनेक जण गंभीर जखमी झाले. त्या दु:खद घटनेतील मृत कुटुंबियांना आधार देणे हे या सदनाचे कर्तव्य ठरते. या दु:खद घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींना तसेच कै.बाबा आमटे, कै. रामराव ज्ञानोबा जगताप-आवरगावंकर, माजी वि.प.स. व कै.य.दि. फडके या तीन महापुरुषांना मी श्रध्दांजली अर्पण करतो आणि हा शोक प्रस्ताव संमत करावा अशी विनंती करतो.

-----

..नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी श्री. बाबा आमटे, थोर समाजसेवक, श्री. रामराव ज्ञानोबा जगताप-आवरगांवकर, माजी वि.प.स. व श्री. य.दि.फडके, ज्येष्ठ साहित्यिक यांच्या दु:खद निधनाबद्दल तसेच दिनांक 20 जानेवारी, 2008 रोजी मुंबईतील यात्रेकरुंच्या बसला वणी (जि.नाशिक) येथे झालेल्या भीषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींबद्दल शोकप्रस्ताव मांडला आहे, त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महान कर्मयोगी बाबा आमटे यांच्या निधनामुळे एका तपस्वी जीवनाची इतिश्री झाली आहे असे मी प्रथम नम्रपणे सांगू इच्छितो.

समाजातील दु:ख, दैन्य, दारिद्रय सर्वांनाच दिसते परंतु ते दूर करण्यासाठी विडा उचलणारे फार कमी असतात आणि त्यातही घेतलेले कार्य अखेरच्या श्वासापर्यंत करीत राहणारे कर्मयोगी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असतात. माननीय बाबा आमटे त्यापैकी एक होते.

कुष्ठरोग्यासारख्या समाजातील दीनदुबळया, दुर्लक्षित घटकाबद्दल सर्वांनाच करुणा वाटते त्यापैकी काही जण अशा उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी प्रयत्नही करतात, परंतु बाबा आमटे अशा सर्व समाजधुरिणापेक्षा आगळेवेगळे होते. कारण ते स्वत: तर अशा घटकांसाठी अखेरच्या श्वासापर्यंत झिजलेच परंतु आपल्या बरोबर आपल्या कुटुंबातील सर्वांनाच त्यांचे सर्वस्व समर्पण करण्याची प्रेरणा दिली.

सभापती महोदय, चंद्रपूर, गडचिरोली जिल्हयातील अतिदुर्गम भागातील आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बाबांनी विडा उचलला होता. मी स्वत: बाबांच्या आनंदवनाला अनेकवेळा भेट दिली आहे. बाबांप्रमाणेच त्यांचे दोन्ही चिरंजीव डॉ. विकास, डॉ.प्रकाश त्यांच्या पत्नी डॉ. मंदा आणि डॉ. भारती त्याचप्रमाणे बाबांची नातवंडे डॉ. दिगंत व डॉ. अनिकेत या सर्वांचेच काम पाहून मीच काय पण समाजासाठी नि:स्वार्थपणे काम करणारे अनेक दिग्गजही नतमस्तक होतात.

बाबांच्या अतुलनीय व अवर्णनीय कामाची दखल जगभरातील मान्यवरांनी घेतली आहे. आंतरराष्ट्रीय किर्तीच्या मॅगसेसे पुरस्कारापासून राष्ट्रीय स्तरावरील पद्मश्री, पद्मविभूषण पुरस्कारांपर्यंत, इतके पुरस्कार बाबांना मिळालेले आहेत की, त्या पुरस्कारांची यादी करायची म्हटली तर ती हातभर लांब होईल, परंतु हे सर्व पुरस्कार त्यांच्या कर्तुत्वापुढे थिटेच आहेत.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

बाबांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांचे कार्य महाराष्ट्रापुरते सिमित राहिले नव्हते. पंजाबमध्ये झालेल्या दहशतवादी कारवायांनी व्यथित झालेल्या बाबांनी भारत जोडो यात्रा काढली. पंजाबतच नव्हे तर भारताच्या सर्व प्रांतात फिरुन सौहार्द आणि बंधुभाव वाढविण्यासाठी पराकोटीचे प्रयत्न केले.

आधुनिकीकरणाच्या व नागरिकीकरणाच्या रेटयात नष्ट होणारी वनसंपदा आणि पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी बाबांनी आंदोलनाचा मार्ग अवलंबिला.

राजकारणात न पडताही एखादी व्यक्ती अजरामर किर्तीचे किती उंच शिखर गाठू शकते याचे मुर्तिमंद उदाहरण म्हणजे डॉ. बाबा आमटे.

बाबा आज हयात नसले तरी समाजातल्या दीनदुबळया, पिडीत लोकांच्या मनात बाबांबद्दल आदराचे, अविचल आणि उतुंग असे जे स्थान निर्माण झाले, ते चिरंतन आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ 15:00

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, थोर साहित्यकर्मी कै.य.दि.फडके यांचेही दिनांक 11 जानेवारी 2008 रोजी निधन झाले. विसाव्या शतकातील इतिहासकार म्हणून य.दिं.ची इतिहासात नोंद होईल इतके समृध्द लिखाण त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत केले आहे. विसाव्या शतकातील थोर चरित्रकार लेखक म्हणूनही त्यांचेच नांव पुढील काळात घेतले जाईल. कारण 'कहाणी सुभाषचंद्रांची', 'शोध सावरकरांचा', 'सेनापती बापट', 'गोपाळ गणेश आगरकर', 'विष्णूशास्त्री चिपळूणकर', 'डॉ.आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह', 'र.धों.कर्वे', 'केशवराव जेधे', इत्यादी त्यांनी लिहिलेली चरित्रे खूपच वाचकप्रिय झाली आहेत.

समाजशास्त्र, अर्थशास्त्र, कायदा, इतिहास, राजकारण आदी विषयावर जवळपास 70 हून अधिक पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. 'लोकसभा निवडणूका 1952 ते 1999' हे पुस्तक सध्याच्या काळात राजकीय पक्षांच्या नेत्यांना खूपच मार्गदर्शक ठरले आहे. त्यांच्यासाठी ती एक चालती-बोलती डिक्शनरीच आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचा इतिहासही त्यांनी लिहून ठेवला आहे. आपल्या पी.एच.डी.च्या प्रबंधासाठी त्यांनी त्यासाठी केलेला अभ्यास म्हणजे संशोधनाचा वस्तुपाठ आहे. हे संशोधन करताना त्यांनी कै. मोरारजी देसाई व कै. चिंतामणराव देशमुख दोघांच्याही व्यक्तिमत्वाचा सखोल आढावा घेतला. अतिशय नि:पक्षपणे त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे स्वरुप आपल्या सिध्दहस्त लेखणीने मांडले आहे.

अलिकडच्या काळात अशा विषयावर लिखाण करावयाचे झाल्यास कोणाच्या भावना कधी दुखावतील व आंदोलन पेटेल हे सांगता येत नाही. लेखकांना लिखाण करताना अलिकडे आंदोलनकर्त्यांचे भय वाटते. आपल्या पुस्तकांची होळी होईल की काय ? अशी एक साधार भीती त्यांच्यात असते. य.दि.फडके मात्र याला अपवाद होते. त्यांनी आतापर्यंत जे जे लिखाण केले ते अतिशय नि:पक्षपातीपणे व कोणाची भीडभाड न ठेवता केले. त्यांच्या जाण्यामुळे परखड विचारसरणीच्या एका सिध्दहस्त लेखकाची साहित्यसेवा समाप्त झाली. मी व माझा भाजपा पक्ष सभागृहाच्या नेत्यांनी आणलेल्या शोकप्रस्तावाचे समर्थन करतो.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, कै.रामराव आवरगांवकर हे एक कॉंग्रेसचे जुने कार्यकर्ते होते. त्यांचा आणि माझा साधारणत: 1980 च्या दरम्यान व्यक्तिश: संबंध आला. माझा आणि त्यांचा तसा परिचय होता. कॉंग्रेस पक्षातील अतिशय चांगले असे व्यक्तिमत्व आणि कॉंग्रेसचा ध्यास असलेले व्यक्तिमत्व होते. या सदनाचे ते सदस्य होते त्याचप्रमाणे काही काळ ते राज्यसभेचे सदस्यही होते. सातत्याने समाजसेवा करीत राहणे हा कै.रामरावांचा गुण होता. बीड जिल्हयातील एक चांगले व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेलेले आहे. त्यांच्याही दु:खद निधनाबद्दल मी माझ्या भाजपा पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, या दोन थोर व्यक्तिंच्या निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव मांडत असतानाच दिनांक 20 जानेवारी,2008 रोजी मुंबईतील यात्रेकरुंना घेऊन जाणाऱ्या बसला वणी येथे भीषण अपघात होऊन त्यामध्ये 40 लोकांचा दुर्देवी मृत्यू झाला. या मृत व्यक्तिंच्या कुटुंबियांवर जो आघात झाला आणि त्यांना जे दु:ख झाले त्यामध्ये हे सभागृह निश्चितपणाने सहभागी आहे. या मृत व्यक्तिंना मी माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे वक्तव्य संपवितो.

----

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय नेते आणि उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. सभापती महोदय, थोर समाजसेवक श्री. बाबा आमटे, माजी विधानपरिषद सदस्य श्री. रामराव आवरगांवकर आणि थोर साहित्यिक श्री. य.दि.फडके यांच्या दु:खद निधनाबद्दल हा शोक प्रस्ताव मांडण्यात आला आहे. त्याचप्रमाणे दिनांक 20 जानेवारी, 2008 रोजी मुंबईच्या यात्रेकरुंना घेऊन जाणाऱ्या बसला वणी येथे जो भीषण अपघात झाला त्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तिंबद्दल देखील शोक प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

सभापती महोदय, कै.बाबा आमटे हे महाराष्ट्राचे भूषण होते. अनेकांनी अनेक क्षेत्रे गाजविली. कै.बाबा आमटे यांनी जे क्षेत्र निवडले ते सेवेचे क्षेत्र निवडले. केवळ दीन-दुबळयांची सेवा नाही तर ज्याला महारोग म्हणतात आणि हा रोग झाल्यानंतर जवळ कोणीही माणूस येत नाही त्यांची सेवा केली आणि अशा कुष्ठरोग्यांना मदतीचा हात दिला तसेच त्यांच्यासाठी आपले स्वत:चे जीवन वाहून घेतले.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ SBT/ 15:05

श्री.मधुकर सरपोतदार.............

'सेवापरमोधर्म:' या तत्वाप्रमाणे आयुष्यभर त्यांनी सेवाधर्म स्वीकारला. हे करीत असताना फक्त दीनदुबळ्यांचीच सेवा करण्याचे त्यांनी व्रत घेतले होते आणि ते तडीस नेले. महाराष्ट्रात कुठे जातीय दंगल झाली, काही संकटे आली, गोदावरी पाणीतंटा निर्माण झाला त्या त्यावेळी ते सलोखा निर्माण करण्यासाठी धावून गेले होते. पाकिस्तानचा दौरा करण्यासाठी सुध्दा ते निघाले होते, परंतु त्यांना परवानगी मिळाली नाही. "जे का रंजले, गांजले त्यासी म्हणे जो आपुले" या उद्देशाने त्यांनी या संपूर्ण कार्यक्रमाला वाहून घेतले होते. मला आठवते, 1992-93 साली मुंबईमध्ये जी जातीय दंगल झाली त्यावेळी आमच्या वांद्रे (पूर्व) भागात कै.बाबा आमटे आले होते. त्यांना उठून बसता येत नसल्यामुळे ते गाडीत झोपून होते, तरी देखील जातीय दंग्यामध्ये पिडित झालेल्या लोकांची चौकशी करण्यासाठी ते आले होते. त्यावेळी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल डॉ.पी.सी. अलेक्झांडर हे होते. बाबा आमटे यांच्याशी माझी त्यावेळी भेट झाली होती. मी एकदा विदर्भाच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या आश्रमाला भेट देण्यासाठी गेलो होतो. माझे नाव कळल्याबरोबर त्यांनी मला बोलावून घेतले. मी त्यांच्या शेजारी बसलो होतो. तुमची लोकसभेतील सगळी भाषणे मी ऐकली आहेत,महाराष्ट्रातून असे स्पष्ट बोलणारे लोक लोकसभेत जायला हवेत अशी त्यांनी टिप्पणी केली आणि मला शुभेच्छा सुध्दा दिल्या होत्या. बाबा आमटेंचे कार्य हे बहुश्रुत आहे, व्यापक आहे. ज्या ज्या ठिकाणी गरज आहे अशा ठिकाणी ते स्वत: उभे राहिले. केवळ उभे राहिले असे नव्हे तर स्वत:च्या सर्व कुटुंबियांना त्यांनी त्या कामामध्ये झोकून दिले. मुलगे, सुना, नातवंडे, पत्नी हे सर्वच त्यांच्या कार्याला वाहून घेत आहेत. त्यांच्या पत्नीची त्यांना सर्वच कार्यात मोलाची साथ लाभली होती. म्हणूनच यावर्षी "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार त्यांच्या पत्नींना दिला गेला. ती सुध्दा एक प्रकारे कौतुकाचीच गोष्ट आहे. शेवटी माणसे कर्तृत्वाने उभी राहतात, सेवेमुळे उभी राहतात. केवळ नाव प्रसिध्द व्हावे, आत्मसन्मान व्हावा यासाठी बाबा आमटे उभे राहिले नाहीत. प्रचार, प्रसिध्दीसाठी उभे राहिले नाहीत. आजचा जमाना पाहिला तर संपूर्ण मुंबई शहरात मोठमोठी होर्डिंग्ज लागलेली आढळून येतात. त्या होर्डिंग्जवर राजकीय नेत्यांचे फोटो असतात, परंतु संबंधित व्यक्तीचे कार्य विचारले तर काहीच नसते असा हा प्रसिध्दी मिळविण्याचा जमाना आहे. प्रसिध्दी विनायकांची संख्या वाढली आहे, परंतु कार्य करणाऱ्या सिध्दीविनायकांची संख्या कमी झाली अशी परिस्थिती आजच्या जमान्याची आहे. अशा पार्श्वभूमीवर बाबा आमटे यांचे कर्तृत्व

..2..

SGB/ MMP/ SBT/ 15:05

श्री.मधुकर सरपोतदार.............

हिमालयाएवढे उत्तुंग आहे. त्यामुळे त्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे अशीच माझी भावना आहे. त्यांना खूप पुरस्कार मिळाले आहेत. परंतु त्या पुरस्कारांपेक्षा त्यांचे कर्तृत्व मोठे होते. हिमालयाएवढ्या मोठ्या कर्तृत्वामुळे त्यांनी कधी हातामध्ये तलवार घेतली नाही. रणांगणावर कधी प्रक्षोभक भाषण केले नाही. मंत्रीपदासाठी राजसत्तेत गेले नाहीत, मंत्रीपद मागितले नाही, खासदारकी मागितली नाही. केवळ सेवेचा वसा हाती घेतला आणि त्यासाठी चार निरनिराळ्या प्रकारचे आश्रम निर्माण केले. या आश्रमांमध्ये परितक्त्या आहेत, गरीब आदिवासी व कुष्ठरोगी आहेत. सगळ्या प्रकारची दीनदुबळी माणसे तेथे आढळून येतात. प्रत्येक दुखण्याला, वेदनेला स्पर्श करणारे त्यांचे बहुश्रुत, बहुपयोगी कार्य पाहिल्यानंतर असे व्यक्तिमत्व भविष्यकाळात महाराष्ट्रात निर्माण होईल का अशी शंका निर्माण होते. अशा थोर व्यक्तिमत्वाचे निधन झाले आहे. महाराष्ट्राच्या सेवेमध्ये नाही म्हटले तरी ताबडतोब न भरुन येणारी खूप मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आकाशाकडे पाहिल्यानंतर ते निरभ्र दिसते आणि काही काळानंतर ढग भरुन आल्यासारखे वाटते असे बाबा आमटेंचे कार्य कुंठित तर होणार नाही ना? पुढे जाईल का? गरिबांसाठी दुर्दम्य इच्छा असणारे व्यक्तिमत्व त्यागातून उभे राहील का असा संदेह निर्माण होतो. म्हणून या ठिकाणी सन्माननीय गृहमंत्री व या सभागृहाचे नेते श्री.आर.आर.पाटील यांनी बाबा आमटे यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाला माझ्यातर्फे आणि माझ्या पक्षातर्फे पाठिंबा जाहीर करतो.

सभापती महोदय, दुसरे एक महनीय व्यक्तिमत्व ज्येष्ठ साहित्यिक कै.य.दि.फडके. आमच्या वांद्रे (पूर्व) भागातील साहित्य सहवास याठिकाणी ते रहात होते. त्यांचा माझा चांगला परिचय होता. त्यांची खूप मोठी ग्रंथसंपदा आहे. ही प्रचंड ग्रंथसंपदा त्यांनी लिहिली कधी? जीवनाकडे पाहिले तर त्यांचा जन्म 03 जानेवारी, 1931 रोजी झाला.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .......

आणि आता त्यांचा मृत्यू 11 जानेवारी, 2008 रोजी झाला. एवढया कालखंडात कै. य.दि.फडके यांनी निरनिराळया विषयांवर प्रचंड ग्रंथसंपदा लिहून काढली. एवढेच नव्हे तर निरनिराळया लोकांचे व्यक्तिमत्व, चारित्र्य, त्यांचा खरा इतिहास, संपूर्ण संदर्भ घेऊन व संशोधन करुन लेखन केला. थोडक्यात कै. य.दि.फडके यांनी प्रत्यक्ष वस्तुस्थितीनिष्ठ व कागदपत्रे तपासून आणि त्यांचे संशोधन करुन त्यांनी इतिहासाचे लेखन केले व खरा इतिहास लोकांसमोर उभा केला. एक चांगले प्राध्यापक आणि अतिशय चांगले लेखक असे समाजात त्यांचे वर्णन होत होते. "अग्निदिव्य" हे नाटक त्यांनी लिहिले आणि त्याचा पहिलाच प्रयोग शिवाजी मंदिर येथे होणार होता. त्यांना बोलाविण्यासाठी दिग्दर्शक वगैरे गेले असता त्यांची तब्येत बरी नव्हती तरी ते म्हणाले की, मी लिहिलेले नाटक जर रंगमंचावर पहिल्यांदाच सादर होत असेल तर ते मी पाहिलेच पाहिजे, म्हणून ते पत्नीसह शिवाजी मंदिर येथे आले. त्याच वेळी आणि त्याच ठिकाणी त्यांच्या जीवनाचा अंत व्हावा, ही शोकांतिका आहे. म्हणून कुठल्या माणसाला कुठे आणि कधी मरण येईल हे आपण सांगू शकत नाही. पण ज्या क्षेत्रात स्वत:ला वाहून घेतले त्याचे प्रतिबिंब पाहण्यासाठी गेले परंतु त्याच ठिकाणी लघुशंका आल्यासारखे वाटले म्हणून ते बाथरुमला गेले असता अचानक मृत्यूने त्यांच्यावर झडप घातली व ते पंचतत्वात विलीन झाले याचेच दु:ख वाटते. अशा उत्तुंग व्यक्तिमत्वाचा लेखक आज आपल्यामध्ये नाही त्याबद्दल सबंध महाराष्ट्राला दु:ख झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांना मी माझ्यातर्फे, माझ्या पक्षाच्या वतीने विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

यानंतर कै. रामराव ज्ञानोबा जगताप-आवरगांवकर माजी वि.प.स. यांची आणि माझी तेवढी ओळख नव्हती परंतु त्यांचा परिचय मी वाचला त्यावरुन असे दिसते की, त्यांनी कम्युनिस्ट पक्षातून सुरुवात करुन हळुहळु निरनिराळया प्रकारचे काम करुन मराठवाडा ज्यावेळी हैद्राबादमध्ये होता त्यावेळी मराठवाडयाचे प्रतिनिधीत्व केले. त्यानंतर महाराष्ट्रात मराठवाडा विलीन झाल्यानंतर ते महाराष्ट्रामध्ये सुध्दा सन 1952 मध्ये निवडून आले, विधान परिषदेवर सुध्दा ते निवडून आले आणि राज्यसभेवर देखील त्यांनी काम केले. अशा प्रकारचे गौरवांग व्यक्तिमत्व, समाजसेवक, समाजासाठी वाहून घेणारे, शांत स्वभावाचे व्यक्तिमत्व आज अंतर्धान पावले, त्यांच्या स्मृतिला सुध्दा मी माझ्या व माझ्या पक्षाच्यावतीने विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

......2

03-10-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .......

यानंतर वणी, जि. नाशिक येथे यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरुंच्या बसला दि. 20 जानेवारी, 2008 रोजी भीषण अपघात होऊन अनेक यात्रेकरु मृत्युमूखी पडले. यासंदर्भात मला माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, ज्यावेळी असे अपघात होतात त्यात मग साईबाबाच्या दर्शनासाठी शिर्डीला गेल्यानंतर परत येतांना अपघात होतो तर कधी कोल्हापूर येथील अंबाबाईच्या दर्शनाहून परत येतांना अपघात होतो. असे अपघात होण्याचे प्रकार सातत्याने वाढत आहेत. यासंदर्भात नीट चौकशी करुन असे अपघातांचे प्रमाण कमी व्हावे म्हणून त्यावर नियंत्रण असले पाहिजे. अशा बसचे ड्रायव्हर्स कधी कधी व्यसनाधिन असतांना बस चालवित नाही ना याची काळजी घेतली पाहिजे तसेच प्रवाशांनी सुध्दा याबाबत खात्री करुन घ्यावी. कारण वाहनचालक सुस्थितीत असेल तरच प्रवाशांचे जीवन सुखावह होऊ शकते, अन्यथा नाही. शेवटी जीवन सुरक्षित राहणे हे सर्वात महत्वाचे आहे. त्यासाठी आवश्यक उपाययोजना महाराष्ट्राचे परिवहन खाते ज्यांच्याकडे आहे त्यांनी याकडे लक्ष देऊन अशा गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. या सर्व यात्रेकरुंना देवाज्ञा झाली ते आपण स्वीकारलेच पाहिजे. त्याशिवाय आपण काहीच करु शकत नाही. या यात्रेकरुंना मी माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो आणि या शोक प्रस्तावाला पाठिंबा जाहीर करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----------------

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर ) : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी सभागृहाच्या नेत्यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझ्या सद्‌भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाबा आमटे यांच्या दु:खद निधनाने स्वातंत्र्य चळवळीत काम करणारा एक थोर स्वातंत्र्य सैनिक आपल्यातून निघून गेलेला आहे, एवढेच नव्हे तर स्वातंत्र्य आंदोलनामध्ये हिरिरीने भाग घेत असतांना स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर समाजातील जी विविध व्याधी युक्त अंगे आहेत त्यासाठी त्यांनी वाहून घेतले होते. आमच्या भागात बाबा आमटे, शिवाजीराव पटवर्धन यांनी फार मोठे कार्य केलेले आहे. बाबा आमटे यांना राजकीय अंग नव्हते अशातला भाग नसून त्यांनी अगदी सुरुवातीच्या काळात वरोरा नगरपालिकेचे उपाध्यक्ष म्हणून काम केले होते परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी कुष्ठ रोग्यांच्या सेवेसाठी हिरिरीने वाहून घेऊन एक आदर्श उभा केलेला आहे. बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांसाठी जे काम केलेले आहे त्याची माहिती जवळ जवळ सर्वांनाच आहे. कुष्ठरोग्यांची सेवा तसेच इतर क्षेत्रात, विशेषत: पर्यावरण संरक्षण, राष्ट्रीय एकात्मता, हुंडा विरोधी चळवळ आणि नर्मदा प्रकल्प ग्रस्तांना मिळणा-या सोयीसुविधेच्या बाबतीत त्यांनी जे काम केलेले ते चिरस्मरणार्थ राहणारे आहे. पुरस्कार, पुरस्कार म्हणजे किती पुरस्कार त्यांना मिळाले हे येथे सांगून सभागृहाचा वेळ घ्यावा असे मला वाटत नाही. मला त्यांच्या कार्य कर्तृत्वामध्ये एक जी गोष्ट दिसली त्याबाबतीत मी धावता उल्लेख करणार आहे. टोकाच्या शारीरिक व्याधिने पछाडलेले असतांना सुध्दा त्यांनी प्रदीर्घ काळापर्यंत सामाजिक कार्यात गुंतवून घेऊ शकतो यासारखे चटकन लक्षात येण्यासारखे उदाहरण मला दुसरे तरी कोणतेही दिसत नाही. या ठिकाणी माननीय सरपोतदार साहेबांनी सांगितले होते की, मुंबईत ज्यावेळेस दंगली झाल्या होत्या त्यावेळेस बाबा आमटे आले होते. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी 1982-83 मध्ये नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचा सदस्य होतो त्यावेळेस बाबा आमटे यांना डी.लीट. पदवी देण्यात आली होती. त्यावेळेस ते म्हणाले होते की, कन्व्होकेशनचा कार्यक्रम खूप वेळ चालतो त्यामुळे मला इतक्यावेळ बसणे शक्य होणार नाही त्यामुळे मी या कार्यक्रमाला येऊ शकणार नाही. त्यावेळेस आम्ही त्यांना सांगितले होते की, तुम्हाला जशा स्थितीत जमेल तशा स्थितीत तुम्ही या. त्यावेळेस त्यांना झ ोपलेल्या अवस्थेत व्यासपीठावर बसवून ठेवावे लागले होते, इतका त्यांना स्पाँडॉलिसीस तसेच

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख......

तत्सम व्याधिंचा त्रास होतो. मोठा आजार झाला म्हणजे आपले सर्व संपले अशी लोकांची भावना असते परंतु 1982-83 मध्ये एवढया मोठया प्रमाणात त्यांना व्याधी असतांना सुध्दा आतापर्यंत काम करणे ही काही साधी गोष्ट नाही. बाबा आमटे यांचा जन्म 1914 मध्ये झालेला असतांना, व्याधी असतांना 94 वर्षे आयुष्य जगतो आणि 1982-83पासून ते 2007-08 पर्यंत कन्याकुमारीपासून ते काश्मीर पर्यंतची राष्ट्रीय एकात्मतची यात्रा तसेच गुजरातमधील इटानगरपासून ते अरुणाचलपर्यंत राष्ट्रीय एकात्मतेची यात्रा ही त्यानंतरची आहे. स्पाँडॅलिसीस झाल्यानंतर लोक घराच्या बाहेर सुध्दा पडत नाहीत अशा स्थितीमध्ये ईश्वराने आपल्याला जे जीवन दिलेले आहे ते कशासाठी खर्च करावयाचे ही भावना मनामध्ये ठेवून शेवटच्या श्वासापर्यंत प्रवास करण्याचे असामान्य धैर्य आम्हाला आमच्या डोळयासमोर पहावयास मिळाले होते. असा असामान्य कर्तुत्व असलेला मनुष्य आज आपल्यातून निघून गेलेला आहे. त्यामुळे मी मनापासून शोक भावना व्यक्त करतो.

सभापती महोदय, कै. य. दि. फडके हे राज्यशास्त्राचे निष्णांत प्राध्यापक होते. मुंबई विद्यापीठामध्ये त्यांची राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून गाजलेली कारकिर्द ही संबंध महाराष्ट्राला माहीत आहे. खरे म्हणजे वाख्या सांगणे आणि व्याख्यान देणे ही सोपी बाब आहे पण विद्यार्थी, प्राध्यापक, विचारवंत, टीकाकार, चरित्रकार कसा आसावा याची मोजकी उदाहरणे द्यावयाची झाली तर आपल्याला य.दि.फडके यांचे उदाहरण द्यावे लागेल. पीएच.डी.च्या संशोधसाठी रिसेंट ऑकरन्सचा विषय घेतला होता. त्यांनी हा विषय पीएच.डी.साठी घेतला होता त्यावेळेस संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला 5-10 वर्षे सुध्दा झाली नव्हती. खूप लांबचे लिहिणे तुलनेने सोपे असते परंतु खूप जवळचे लिहिणे अवघड असते. कारण जवळच्या लिहिण्यामध्ये अनेक साक्षीदार हजर असतात. माननीय चिंतामणराव देखमुखांनी त्यांना जी मुलाखत दिली होती, त्याचे जे त्यांनी रेकॉर्डींग केलेले होते ते त्यांनी तपासून घेतलेले आहे. संशोधकानी किती काळजी घेतली पाहिजे हे त्यांनी दाखवून दिले आहे. नाही तर मी सांगितले काय आणि तुम्ही ऐकले काय असे होता कामा नये.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ...

कै.य.दि.फडके यांनी राजीनामा कोणत्या परिस्थितीमध्ये दिला होता आणि त्यांचे कोणाशी बोलणे झ ाले होते इत्यादी संबंधीचे त्यावेळचे सर्व बारकावे त्यांनी अभ्यासात मांडले होते. ते पी.एच.डी.चे विद्यार्थी होते. तसा जर विचार केला तर पी.एच.डी.चा विद्यार्थी या नात्याने अनेक दिवस पर्यंत अनेक लहान सहान बारकाव्यांचा अभ्यास करुन त्यांनी या सर्व बाबी अभ्यासात मांडल्या होत्या. मी स्वत: या बाबाबतचा अनुभव घेतलेला आहे. सत्य लिहिण्याच्या बाबतीत त्यांच्या संदर्भातील एक आठवण मी मुद्दाम आपल्याला येथे सांगू इच्छितो. 1970-72 च्या दरम्यान महाराष्ट्र पाठयपुस्तक मंडळाने नवव्या वर्गासाठी नागरिकशास्त्र विषयाचे पुस्तक लिहिण्यासाठी एक लेखक मंडळ नेमले होते. कै. य.दि.फडके, श्री. ना.य.डोळे, श्री.सुधाकर प्रभू व प्रा..बी.टी.देशमुख असे चार जण त्या मंडळामध्ये होते. पुस्तक लिहिण्यामध्ये फार वेळ जाता कामा नये म्हणून प्रत्येकाने दोन दोन प्रकरणे लिहून आणावीत अशी त्यावेळी बोर्डाची पध्दत होती. परंतु त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, अशी पध्दत चालणार नाही. प्रत्येक जण दोन दोन प्रकरणे लिहून आणतील हे बरोबर आहे परंतु त्यांच्याकडून जे काही लिहून आणले जाईल ते पाहिल्यानंतरच आम्ही ते मान्य करु. न पाहता आम्ही ते मान्य करणार नाही. अन्यथा तुम्ही पुस्तकाच्या पहिल्या पानावर असे लिहावे की, पहिल्या दोन प्रकरणाचे लेखक कै. य.दि.फडके आहेत. त्यानंतरच्या दुसऱ्या प्रकरणाचे लेखक श्री.ना.य.डोळे आहेत. त्या वेळचे अधिकारी त्यांना असे म्हणाले की, "इतर बोर्डामध्ये असाच प्रकार सुरु आहे ". कै. य.दि.फडके त्यांना असे म्हणाले की, " इतर बोर्डामध्ये तसे चालू द्यावे परंतु येथे मात्र तसे चालणार नाही." त्यानंतर कै. य.दि.फडके यांनी जी पध्दत सांगितली होती तीच पध्दत मान्य झाली होती. ही पध्दत अशी होती की, जी दोन किंवा तीन प्रकरणे आपल्या वाटयाला येतील ती प्रकरणे प्रत्येकाने लिहून आणावयाची. त्यावेळी झेरॉक्स कॉपी काढण्याची सोय नव्हती. तसेच कॉम्प्युटरची देखील व्यवस्था नव्हती. त्यामुळे सायक्लोस्टाईल करुन सर्वाकडे आठ दिवस अगोदर प्रती पाठविल्या जात होत्या. या प्रतीचे वाचन त्यावेळी केले जावयाचे नाही तर पहिल्या पानावर कोणाला काय सांगावयाचे आहे, दुसऱ्या पानावर काय सांगावयाचे आहे, तिसऱ्या पानावर काय सांगावयाचे आहे असे प्रत्येकाला विचारुन त्यांची मते जाणून घेतली जात होती. ते एका एका गोष्टीमध्ये बारकाईने लक्ष देत असत. हे सांगण्यास मला मनापासून आनंद वाटतो. सभापती महोदय, शास्त्र लिहितांना अव्याप्ती, अतिव्याप्ती, अतिशयोक्ती,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ...

अन्योक्ती, तसेच व्दिरुक्तीही राहणार नाही याची ते काळजी घेत असत आणि एक एक वाक्य ते काळजीपूर्वक तपासून पहात असत. त्याचा परिणाम असा झाला की, या पुस्तकाच्या बाबतीत एका शब्दाची टीका कोठेही करण्यात आली नाही. त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली याचा मला अभिमान वाटतो. त्यांनी अनेक पुस्तके लिहिलेली असून " विसाव्या शतकातील महाराष्ट्र " या विषयावर त्यांनी एक पुस्तक त्यांनी लिहिले होते. त्या पुस्तकाचे एकूण आठ खंड आहेत. अत्यंत बारीक सारीक तपशील त्यांनी या पुस्तकात दिलेले आहेत. अनेकांना अनेक आयुष्य घेऊन सुध्दा एवढे लिखाण करता येणार नाही तेवढे लिखाण त्यांनी केलेले आहे. त्यांना जसे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत तसेच त्यांनी अनेक पुस्तके देखील लिहिलेली आहेत. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची नावे सांगावयाची तरी दम लागण्याची वेळ येईल . आपल्याला जे काही आयुष्य मिळालेले आहे त्या मिळालेल्या आयुष्यात आपला प्रवास अतिशय उत्तम प्रकारे करणारा असा हा शिक्षक आज आमच्यातून निघून गेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी मघाशी सांगितले की," शेवटपर्यंत वाचन आणि लेखण करणे व त्यावर क्रिया प्रतिक्रिया देण्यामध्ये कै. य.दि.फडके यांना आनंद वाटत होता. आयुष्याच्या उत्तरार्धामध्ये आता आपले काही राहिलेले नाही अशी भावना अनेक लोकांमध्ये निर्माण होत असते परंतु त्या पासून ते फार वेगळे होते. विशेषत: आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी विषयीची पुस्तके लिहिण्यामध्ये त्यांचे जे योगदान आहे ते महाराष्ट्राला कधीही विसरता येणार नाही. एवढी मेहनत आणि एवढे कष्ट त्यांनी त्या कामासाठी घेतले होते.

सभापती महोदय, माजी सन्माननीय सदस्य कै. रामराव जगताप - आवरगावकर यांच्या दु:खद निधनाबद्दल या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या त्यामध्ये मी सहभागी आहे. त्याच बरोबर नाशिक जवळील वणी येथे यात्रेसाठी जे यात्रेकरु गेले होते त्यांचे अपघातामध्ये दु:खद निधन झालेले आहे. त्या बद्दल मी शोक व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर सह वेदना व्यक्त करण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, कै. बाबा आमटे यांच्या कार्याबद्दलचे वर्णन महात्मा गांधी यांनी "अभय साधक " या दोन शब्दात केले होते. कै. साने गुरुजी यांना बाबा आमटे मानत होते आणि कै. साने गुरुजींचे आचार्य अत्रे यांनी "अश्रुंचा महाकवी" असे वर्णन केले होते. तेच शब्द वापरुन "दु:खीतांच्या, पीडितांच्या वेदनांचा महाकवी" असे कै. बाबा आमटे यांचे वर्णन करता येईल. या देशातील हजारो तरुणांना विधायक कार्यासाठी कै. बाबा आमटे यांनी प्रेरणा दिली असून अनेक ठिकाणी त्यांच्या श्रम छावण्या आजही चालू आहेत. त्यातून या देशातील हजारो कार्यकर्ते घडलेले आहेत व त्यांनी विधायक कार्यासाठी वाहून घेतलेले आहे. कै. बाबा आमटे यांची "भारत जोडो" यात्रा मी स्वत: अनुभवली होती.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

हा देश एक रहावा, एकात्म रहावा यासाठी या वयामध्येदेखील ते धडपडत होते. आपल्या खांद्यावरील मानवतेचा, समतेचा, धर्मनिरपेक्षतेचा, विश्वबंधुतेचा झेंडा त्यांनी केव्हाही खाली उतरू दिला नाही. आपल्या आयुष्याची अखेर रावी तीरावर, पाकिस्तानामध्ये जाऊन तेथे सूर्य पाहत असताना व्हावी अशी इच्छा त्यांनी बोलून दाखविली होती. हे एखाद्या महाकविलाच शोभू शकतो. कुष्ठरोग्यांची आणि चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींची सेवा त्यांनीच नाही तर त्यांच्या सबंध कुटुंबियांनी केली व आजही करीत आहेत, त्यांच्या त्या सेवेला जगामध्ये तोड नाही. त्यांनी आपल्या मुलांनाच डॉक्टर केले असे नाही तर पहिला माडिया डॉक्टर घडविण्याचे काम देखील बाबांनीच केले हे विसरता येणार नाही. या महामानवाला माझ्यातर्फे आणि लोकभारतीतर्फे मी आदरपूर्वक श्रद्धांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, डॉ. य.दि.फडके हे थोर विचारवंत होतेच पण ते एक साक्षेपी संशोधक देखील होते. ब्राह्मणेतर चळवळीचा इतिहास ज्या पद्धतीने या महाराष्ट्राला उलगडून दाखविला तो महाराष्ट्राच्या पुढील वाटचालीसाठी फार मोठा ठेवा आहे. अतिशय दीपस्तंभासारखे काम त्यांनी करून ठेवले आहे. त्यांनी असंख्यांची चरित्रे लिहिली आहेत, एकोणीसाव्या आणि विसाव्या शतकातील अनेक नेत्यांची चरित्रे लिहिली आहेत. ज्याचा उल्लेख आता येथे करण्यात आला. छत्रपति शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक यांच्यामध्ये जो प्रचंड वाद झाला त्या विषयावरील नाटक श्री.अशोक पाटोळे यांनी लिहिले, ते नाटक श्री.य.दि.फडके पहावयास गेले असताना, कारण त्यांनी लिहिलेल्या चरित्र ग्रंथावरून श्री.पाटोळे यांनी ते नाटक लिहिले होते. मी याची आठवण एवढ्यासाठीच करतो आहे की, आता या ठिकाणी ज्याप्रमाणे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी देशमुख म्हणाले की, जसे बाबांनी मिळविलेल्या पुरस्कारांची गणती करता येत नाही तशी य.दिं.नी लिहिलेल्या पुस्तकांची गणती करता येणार नाही. पण हे सगळे करीत असताना चित्रपट, नाटक हे देखील ते आवर्जून पहावयाचे. किती तरी चित्रपट त्यांनी थिएटरमध्ये जाऊन आवर्जून पाहिले होते. लोकांना आश्चर्य वाटायचे की, यांना इतका वेळ तरी कसा मिळतो. इतका हा प्रतिभावान मनुष्य होता. मी त्यांना लोकभारती तर्फे श्रद्धांजली वाहतो.

...... ओ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

सभापती महोदय, वणी येथे दर्शनाला गेलेल्या भाविकांपैकी जे अपघातग्रस्त झाले, मृत्यूमुखी पडले त्यांच्याबाबत आता सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार दादांनी जी सूचना केली तिला मी दुजोरा देतो. सभापती महोदय, हे जे मोठ्या प्रमाणात अपधात होत असतात, अलिकडेच मुंबईत एक मोठा अपघात झाला. शाळकरी मुलांना पोहोचविणाऱ्या व्हॅनला आग लागली आणि त्यात 6 मुले गेली. त्यांची आठवण यासाठी मी करतो की, हे असे अपघात टळावेत यासाठी काही ठोस उपाय योजना करायला पाहिजे. या सभागृहाचे नेते जरूर या गोष्टीची दखल घेतील.

सभापती महोदय, या सदनाचे माजी सदस्य आणि माजी खासदार श्री.रामराव आवरगांवकर यांचेही दु:खद निधन झाले, त्यांनाही मी माझी श्रद्धांजली वाहतो.

***

...... ओ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरूण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, थोर समाजसेवक बाबा आमटे, ज्येष्ठ साहित्यिक श्री.य.दि.फडके, श्री.रामरावजी जगताप-आवरगांवकर, माजी वि.प.स. आणि वणी येथील देवीच्या दर्शनाला गेले असता अपघात होऊन मृत्यूमुखी पडलेले भक्तगण यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, कै. बाबा आमटे हे एक वेगळे असे व्यक्तिमत्त्व होते. एक सेवाभावी असे हे व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे जीवन हीच सेवा. ते म्हणत असत की, सेवा हीच माझी कविता आहे, सेवा हेच माझे साहित्य आहे, सेवा हेच माझे तत्त्वज्ञान आहे आणि सेवा हीच माझी भक्ती आहे. अशा पद्धतीने एक उच्च श्रेणीची सेवा ज्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात केली. मघाशी या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, गेली 25 वर्षे ते बसू शकत नव्हते पण अशा परिस्थितीत देखील सेवा मात्र त्यांनी सातत्याने सुरू ठेवली होती. अशा पद्धतीचे फार वेगळे असे व्यक्तिमत्त्व कै. बाबा आमटे यांचे होते. त्यांनी उभारलेल्या आश्रमाला त्यांनी 'आनंदवन' असे नाव दिले होते. त्या आनंदवनाच्या माध्यमातून इतरांच्या जीवनामध्ये आनंद आणणे या संदर्भातील कार्य सातत्याने 50-60 वर्षे त्यांनी केलेले आहे. केवळ एका व्यक्तीने ही सेवा केली आहे असे नाही तर ते स्वत:, त्यांच्या पत्नी साधनाताई, त्यांची मुले विकास आणि प्रकाश इतकेच नाही तर त्या मुलांची मुले ही देखील या सेवेत कार्यरत होते आणि आहेत. म्हणजे समर्पित जीवन केवळ एकाचेच नाही तर चार पिढ्यांचे समर्पित जीवन, मला वाटते की, केवळ या भारतातच नाही तर जगामध्ये सेवेच्या बाबतीत ज्यांनी 'सेवे'चा एक इतिहास निर्माण केला आहे, अशा प्रकारचे व्यक्तिमत्त्व बाबा आमटे यांचे होते. कुणी तरी असे म्हटले आहे की, किंग इज डेड, बट लॉंग लिव्ह द किंग. राजा मेला असेल, पण राजा जीवंत आहे. बाबा आमटेंचे विचार आज देखील जीवंत आहेत. सेवेच्या माध्यमातून, माणुसकीच्या माध्यमातून माणूस किती मोठा होऊ शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण बाबा आमटे हे स्वत: आहेत. सभापती महोदय, मला आनंदवन येथे जाण्याची संधी मिळाली, बाबांचे दर्शन घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्याची देखील संधी मिळाली. त्यांचा एकेक शब्द, त्यांचे साहित्य देखील तितकंच. ज्वाला आणि फुले, उज्ज्वल उद्यासाठी. मी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना विनंती करीन की, त्यांची ही पुस्तके टेक्स्ट बुक म्हणून कोठे तरी येऊ द्यात. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... पी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

त्यांनी "उज्ज्वल उद्यासाठी" म्हणून तरुणाईवर लिहिलेले वाक्य आपणास सांगतो. "A Youth is the one who rides on the Whirlwind and directs the star; Youth is one whose attention is welded to its purpose. A youth is one who rides on the whirlwind, a youth is one, the adventure is chronic in his eyes." काय शब्द आहेत? तरुण कसा असला पाहिजे? तरुणाई कशाला म्हणतात? घन अंधकारात ढगांवर बसून विजेचा चाबूक घेऊन सारथ्य करतो तो. किंवा जगातील अंधारलेला कोपरा प्रकाशमय करतो तो.

त्याप्रमाणे आपल्या ह्रदयातील अंधकारमय कोपरा प्रकाशमान करणारे असे ते तरुण आहेत. असे त्यांचे फार मोठे जीवन आहे. त्यांच्या माध्यमातून समाजाची उच्च श्रेणीची सेवा आणि एका नव्या समाजाच्या निर्मितीचा, मूल्यांचा विचार हे बाबा आमटे यांचे विचार होते. जे अपंग आहेत, विद्यार्थी आहेत, कुष्ठरोगी आहेत, ज्यांना कुणी स्पर्श करीत नाही. जो शेवटचा वंचित असलेला माणूस आहे, तळागाळातील माणूस आहे, ज्यांची सेवा करण्याकरिता आणि त्यांच्यावर उपचार करण्याकरिता ज्यांचे संपूर्ण आयुष्य गेले असे एक विरळ व्यक्तिमत्व भारतामधून नव्हेतर जगामधून निघून गेले आहे, त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, डॉ. य. दि. फडके यांच्या बाबतीत आपण सर्वांनी सांगितले आहे. एक उत्तम अध्यापक, आदर्श प्राध्यापक, लेखक, समिक्षक, निरीक्षक, साहित्यिक जितक्या उपमा देऊ तितक्या कमी आहेत. अशापध्दतीने डॉ. य. दि. फडके यांचा सीमा भागाशी संदर्भ असेल, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीशी संदर्भ असेल, बेळगाव येथे झालेल्या 73 व्या साहित्य संमलेनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले काम असेल, असे विविधांगी व्यक्तिमत्व होते. कुणी फक्त साहित्यिक असतात, कुणी लेखक असतात, कुणी प्राध्यापक असतात. परंतु हे चतुरस्त्र व्यक्तिमत्व होते. असे हे चतुरस्त्र व्यक्तिमत्व आमच्यातून निघून गेले. त्यामुळे या महाराष्ट्राची फार मोठी हानी झाली आहे.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे माजी विधान परिषद सदस्य कै. श्री.रामराव ज्ञानोबा जगताप आवरगांवकर यांच्याशी माझा फारसा संबंध आलेला नाही. ते या सभागृहाचे सदस्य होते. त्याचप्रमाणे ते राज्यसभेचे देखील सदस्य होते. महाराष्ट्राच्या बीड जिल्हयामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये,

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

सहकार क्षेत्रामध्ये त्यांनी केलेल्या कार्याची इतिहासाने नोंद घ्यावी अशापध्दतीचे कार्य त्यांनी केले होते.

सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री यांना मी विनंती करतो की, वणीची सप्तशृंगीची देवी ही आमची खानदेशाची देवी आहे. लाखो भाविक त्या ठिकाणी दर्शनासाठी जात असतात. A Godess of the masses अशाप्रकारे तिचे वर्णन करुन सांगितले जाते. ज्याच्या खिशामध्ये काही नाही, असे लोक अनवाणी पायी येत असत. पायी चालण्याचे अंतर पूर्वी 100 मैल होते नंतर ते किलोमीटर झाले. आता रस्ता चांगला झाल्यामुळे गाडी शेवटपर्यंत जाते. हा अपघात अनवधानाने झाला असेल. परंतु शासनाला या सभागृहाच्या माध्यमातून विनंती करतो की, जास्तीत जास्त निधी या तीर्थश्रेत्राला देण्याची आवश्यकता आहे. केवळ हे धार्मिक क्षेत्रच नाही तर वर डोंगरावर गेल्यानंतर माणसाचे मन पवित्र होते. त्या डोंगरावर गेल्यानंतर खालील सुंदर परिसर दिसायला लागतो. अशापध्दतीचे हे तीर्थक्षेत्र आहे. झालेली घटना अत्यंत दुखदायक असून ती पुन्हा होऊ नये याकरिता शासनाच्या माध्यमातून कारवाई व्हावी अशापध्दतीची मागणी करुन पुनश्च सर्वांना श्रध्दांजली अर्पण करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री यांनी या ठिकाणी जो शोकप्रस्ताव मांडला आहे.त्या प्रस्तावाला माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अनेक माननीय सदस्यांनी थोर समाजसेवक स्वर्गीय बाबा आमटे यांचे या ठिकाणी केलेले वर्णन मी ऐकले. त्यांचे वर्णन, त्यांच्या उपाध्या, त्यांचे पुरस्कार, त्यांचे झालेले सन्मान हे कितीही झ ाले तरी ते कमीच आहेत. असे त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्व होते. जेव्हा मनुष्य ऐहिक जीवनामध्ये सर्व भोगतो आणि ते सर्व सोडून पुन्हा सेवाव्रतामध्ये जातो त्याला त्याग म्हणतात. आणि म्हणून याठिकाणी केलेल्या वर्णनाप्रमाणे त्यांनी अगोदर वकिली केली, ते नगरपालिकेमध्ये निवडून आले आणि नगरपालिकेचे उपाध्यक्ष झाले, त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनामध्ये स्वत:ला झोकून दिले. परंतु त्यानंतर या सर्व गोष्टींचा त्याग करुन त्यांनी समाजसेवेचे व्रत अंगिकारले.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

खरे म्हणजे समाजामध्ये अत्यंत वंचित,उपेक्षित समाजाची सेवा, आदिवासींची सेवा, मागासलेल्या समाजाची सेवा, गरिबांची सेवा हे सगळे जे शब्द आहेत, त्याच्याही पलिकडे जाऊन म्हणजे ज्या लोकांच्या जवळ जाणेही अवघड आहे, त्यांच्याकडे पहाणेही अवघड आहे अशा कुष्ठ रोग्यांची सेवा करण्याचे व्रत स्व.बाबा आमटे यांनी घेतले आणि यामध्ये त्यांना त्यांच्या पत्नीनेही साथ दिली आहे. याठिकाणी मला त्यांची एक आठवण सांगितली पाहिजे. येथे पूर्वीच्या मूळ चंद्रपूर जिल्हयातील सोमनाथचा उल्लेख झालेला आहे. आता दोन जिल्हे झालेले आहेत. मी महाराष्ट्र युवक कॉंग्रेसचा अध्यक्ष असताना त्याठिकाणी स्व.संजय गांधी यांच्या प्रेरणेने एक महिन्याचे श्रमदान शिबीर घेतले होते. त्यावेळी श्रमदान शिबिरामध्ये स्व.बाबा आमटे आणि त्यांच्या पत्नी श्रीमती साधनाताई असे दोघेही जण दोन दिवस आले होते. मला आजही आठवते की, त्या वेळी केंद्रीय मंत्री असलेले **श्री.चंद्रजित यादव देखील या शिबिरामध्ये आलेले होते**. परंतु आज ते आज हयात नाहीत.त्यांनी त्यावेळी श्री.बाबा आमटे आणि त्यांच्या पत्नी यांचे दर्शन घेतले. त्यावेळी श्रमदान शिबिराचे महत्व सांगताना, श्रमाचे महत्व सांगताना, सेवेचे महत्व सांगताना, त्यांनी बाबांच्या सेवेबद्दल आणि त्यांच्या पत्नीबद्दल आदर व्यक्त केला. त्यावेळी त्यांनी बाबांचा उल्लेख केलाच, परंतु त्यांच्या पत्नीचा उल्लेख करताना कै.माननीय केंद्रीय मंत्री श्री.चंद्रजित यादव असे म्हणाले होते की, "ही मूर्तीमंत साधना आहे. ज्यांनी आयुष्यभर सेवेची साधना जोपासली, त्यांच्या पत्नीचे नाव साधना आहे आणि त्यांनीही या सेवेचे व्रत स्विकारलेले आहे." हे अतिशय दुर्मिळ स्वरुपाचे, अतिशय अवघड असे उदाहरण आहे. या व्रतामध्ये पती-पत्नी, मुले, सूना, नातवंडे, नात-सूना अशा प्रकारे खऱ्या अर्थाने सर्वच कुटुंबाने झ ोकून दिलेले आहे. अशा प्रकारे स्वत:चे जीवन कुष्ठरोग्यांसाठी समर्पित करणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. मघाशी माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे किंवा माननीय उप मुख्यमंत्री, आबा यांनी सांगितल्याप्रमाणे राष्ट्रपिता महात्मा गांधी, श्री.रविंद्रनाथ टागोर आणि श्री.साने गुरुजी ही त्यांची तीन दैवत होती. या तिघांची व्यक्तिमत्व पाहिली तर असे दिसून येईल की, या तिघांच्या व्यक्तिमत्वामध्ये विविध असे सर्व गुण आहेत. त्यामध्ये श्री.रविंद्रनाथ टागोर यांच्यामध्ये उत्तम कविता, गीते, गीतकार, उत्तम काव्य, उत्तम साहित्य आणि देशभक्ती याचाही संगम होता. भारतीय संस्कृतीचे जतन आणि सेवाभावी वृत्ती यामधून उदात्त मानवतावादाचा धर्म श्री.साने गुरुजी यांनी सांगितला. तसेच जगाला प्रेम अर्पावे हा

. . . .क्यु-2

श्री.उल्हास पवार . . . .

खरा धर्म असल्याचे श्री.साने गुरुजी यांनी सांगितले आहे आणि तो धर्म देखील श्री.बाबा आमटे यांनी पाळला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्वातंत्र्य आंदोलन आणि देशभक्ती याबाबतीतच केवळ सांगता येईल असे नव्हेतर, मला त्यांच्याही जीवनातील एक उदाहरण सांगावयाचे आहे की, श्री.पटवर्धन हे एक संस्कृत प्रकांड पंडीत होते. जेव्हा त्यांना कुष्ठरोग झाला, तेव्हा त्यांच्या मुलाबाळांनी त्यांना बाहेर काढले होते. परंतु त्यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी श्री.पटवर्धन यांची सेवा केली, त्यांनी स्वत: श्री.पटवर्धन यांना तेल लावून मसाज करण्याचे काम केले आहे. स्व.बाबा आमटे यांची ही तीनही दैवते होती. त्या प्रत्येकातील काही ना काही गुण घेऊन, त्याप्रमाणे स्वत:चे व्यक्तिमत्व घडवून एक समर्पित अशा प्रकारचे जीवन स्व.बाबा आमटे जगले आहेत. मी त्यांना माझी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे दुसरे थोर सुपूत्र म्हणजे डॉ.य.दि.फडके आहेत. जसे स्व.बाबा आमटे यांचे अनेक विशेषणाने वर्णन करता आले, त्याचप्रमाणे स्व.य.दि.फडके यांचेही वर्णन कितीतरी विशेषणाने करता येईल. एक उत्तम आणि लोकप्रिय प्राध्यापक, समाजचिंतक, विद्वान, संशोधक, नाटककार आणि आणखी जे-जे काही म्हणता येईल ते सर्वकाही. हे सर्व करीत असताना खऱ्या अर्थाने तटस्थतेने म्हणजे कोणत्याही घटनेची प्रतारणा न करता, त्या-त्या घटनेवर भाष्य करण्याचे काम त्यांनी केले आहे.अलिकडच्या काळामध्ये एखाद्या घटनेबाबत काही लिहीताना त्या घटनेची मोडतोड केली जाते. पण डॉ.य.दि.फडके यांनी घटनेची, त्या फॅक्टस्‌ची कधीही प्रतारणा केली नाही. त्यांनी त्या-त्या घटनेबद्दल आपली मते मांडली, त्यांनी त्यांच्या कॉमेंटस् व्यक्त केल्या. पण त्या व्यक्त करताना आपल्याला कोण काय म्हणेल याची काळजी किंवा भीती डॉ.य.दि.फडके यांनी कधीही उराशी बाळगली नाही. तसे ते पुरोगामीच विचाराचे होते. पण त्यांचे एखादे लिखाण वाचून एकांगी पुरोगामित्व मिरविणाऱ्या काही लोकांना त्यांच्याबद्दल मनामध्ये शंका निर्माण होत होत्या. पण डॉ.य.दि.फडके यांचा प्रामाणिकपणा हा इतका तेजस्वी आणि उत्तम होता की, त्याबद्दल कोणालाही बोलण्याची हिंमतच होत नव्हती. इतके तटस्थ, इतके प्रामाणिक असे डॉ.य.दि.फडके होते. येथे अनेक ग्रंथांचा उल्लेख झालेला आहे. याठिकाणी देशभक्त, सत्यशोधक चळवळीतील तात्यासाहेब जेधे म्हणजे केशवराव जेधे त्यांच्या चरित्राचा आणि त्यांच्या समाजकार्याचा

उल्लेख झाला. मी त्याचा एक साक्षीदार आहे. कै.तात्यासाहेब जेधे यांच्याबरोबर आजन्म राहिलेले

. . . .क्यु-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

कै.स.गो.थोरात आणि त्यांचे चिरंजीव, माझे मित्र श्री.धनंजय थोरात जे आज हयात नाहीत. त्यांचे दुसरे चिरंजीव श्री.प्रताप थोरात असून ते "फ्री प्रेस" मध्ये पत्रकार आहेत. मला असे सांगावयाचे आहे की, कै.स.गो.थोरात हे सावलीप्रमाणे, सातत्याने, अखंडपणे कै.तात्यासाहेब जेधे यांच्याबरोबर असावयाचे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे. . . . 15:40

श्री. उल्हास पवार.... . . . ..

कै.तात्यासाहेबांवर ग्रंथ लिहावयाचा होता. कै. स.गो. थोरातसाहेब हे थोडेसे विक्षिप्त होते. कै. तात्यासाहेबांचे जे फोटो, पत्रे आणि कागदपत्रे त्याच्याकडे होते ते श्री. य. दि. फडके यांना द्यावयास तयार नव्हते. पण आपल्याला आश्चर्य वाटेल की, स्व. श्री. यशवंतराव चव्हाण साहेबांनी कै. स. गो. थोरात यांना फोन केला. त्यानंतर डॉ. य.दि. फडकेशी माझी भेट झाली. त्यानंतर कै. स. गो. थोरात यांनी त्यांच्याकडे असलेले कै. तत्यासाहेब जेधे यांची सगळी पत्रे, माहिती आणि त्यांच्याशी झालेला संवाद, फोटोसहीत माझे मित्र कै. धनंजय थोरात यांच्या आग्रहामुळे डॉ. य. दि. फडके यांना दिला, त्याचा मी साक्षीदार आहे. बेळगावगला झालेल्या 76 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्या संमेलनाला जाण्याची मला संधी मिळाली. सीमा लढयाच्या संदर्भातील उल्लेख मी या ठिकाणी केलेला आहे. कै.चिंतामणराव पटवर्धन किंवा संयुक्त महाराष्टाच्या चळवळीतील काँग्रेसच्या संबंधात त्यांनी जो संशोधनात्मक ग्रंथ लिहिला आहे, त्यासंबंधात सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. खूप जुन्या लिखाणाचे कोणी साक्षीदार राहात नाहीत. पण अलिकडच्या काळात आपल्या लिखणाबद्दल कोणीही आक्षेप घेणार नाही इतके तोलून-मापून, तंतोतंत लिहिण्याचे अत्यंत अवघड काम डॉ. य. दि. फडके यांनी केलेले आहे. श्री. चिंतामणराव देशमुखांबरोबर झालेला त्यांचा पत्रव्यवहार किंवा मुलाखत यातील सगळयात महत्वाची जी गोष्ट मला भावलेली आहे, ती गोष्ट मला माहीत नव्हती पण प्रा.बी.टी.देशमुख यांनी ती गोष्ट या ठिकाणी सांगितलेली आहे आणि ती गोष्ट फार महत्वाची आहे. सध्या पाठयपुस्तक संशोधन मंडळ असेल किंवा त्या निमित्ताने निर्माण होणारी पुस्तके असतील त्यासंदर्भात 'नागरिकशास्त्र' या विषयावर चार व्यक्तींची नेमणूक करण्यात आली होती. मूळची धोपटमार्गाने आलेली पध्दती मोडून टाकण्याचे काम आणि डॉ. य. दि. फडके यांनी सुरु केलेली पध्दती स्वीकारण्याचे काम या पाठयपुस्तक मंडळाने केलेले आहे, ही गोष्ट मला भावलेली आहे. नवीन पिढीला आपण काही देत असतांना त्यामधील परखडपणा आणि चिंतन प्रामाणिक असले पाहिजे, हे काम डॉ. य. दि. फडके यांनी केलेले आहे. त्यांचा आणि माझा व्यक्तिगत परिचय होता. त्यांना अनेक वेळा भेटण्याची आणि त्यांचे विचार ऐकण्याची मला संधी मिळाली होती. अशा एका थोर समाजसेवकाला मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार. . .

या सदनाचे सदस्य कै.रामराव ज्ञानोबा जगताप - आवरगांवकर यांचा आणि माझा खूप प्रदीर्घकाळापासून परिचय होता. मी युवक काँग्रेसच्या चळवळीत काम करीत होतो तेव्हा पासून त्यांचा आणि माझा परिचय होता. मी या ठिकाणी प्रामाणिकपणे सांगू इच्छितो की, त्यांचे वय कधी लक्षातच आले नाही. ते प्रचंडप्रमाणात काम करीत असत. 1952 च्या निवडणुकीच्यावेळी त्यांचे वय वर्षे 23 होते. कदाचित जुन्या काळात त्यांची जन्म तारीख बरोबर लिहिलेली नसेल. त्याबाबतीत मला निश्चित माहीत नाही. पण 1952 साली हैदराबाद राज्याच्या विधानसभेत ते निवडून आले आणि 1956 साली मराठवाडा जेव्हा महाद्विभाषिक राज्यामध्ये सामील झाला तेव्हा ते पुन्हा निवडून आले. पहिल्यांदा ते कम्युनिष्ट पक्षात होते, त्यानंतर ते काँग्रेस पक्षात आले. स्वामी रामानंदतीर्थांच्या नेर्तृत्वाखाली अनेक तरुण लढत होते त्यामध्ये कै. आवरगांवकर हे तर अलिकडच्या काळातील अगदीच तरुण होते. रझाकाराच्या काळात हैदराबाद निझामांच्या विरुध्द हैदराबाद स्टेट मुव्हमेंटमध्ये ते अग्रभागी होते. प्रामाणिकपणे काम करीत असतांना स्वातंत्र्यसैनिकांच्या बाबतीत त्यांना अत्यंत वाईट वाटत असे,. मग ते स्वातंत्र्य सैनिक भारतीय स्वातंत्र्य लढयातील असोत, गोवा स्वातंत्र्य लढयातील असोत किंवा हैदराबाद मुक्ती संग्रामातील असोत, ते खोटे आहेत असे दाखविण्याचा काही मंडळींनी प्रयत्न केला तर त्यांच्या विरुध्द लढा देण्याचे काम कै. रामराव आवरगांवकर यांनी केलेले आहे. विधानसभेमध्ये दोन वेळा, विधानपरिषदेमध्ये एक वेळा, राज्यसभेवर एक वेळा, जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष, एस.टी. महामंडळाचे अध्यक्ष आणि विविध पदांवर ते सातत्याने कार्यरत राहिले. शेवटी महाराष्ट्र राज्य स्वातंत्र्यसग्रांम समितीमध्ये माननीय प्रभाकर कुंटे यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती काम करीत आहे त्या समितीमध्ये अत्यंत शेवटच्या क्षणापर्यंत कार्यरत असलेले कै.माननीय रामरावजी आवरगांवकर यांनाही मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

तसेच या ठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे जी तीर्थस्थळे असतील किंवा नाशिक जिल्हयामध्ये वणीच्या देवीच्या यात्रेसाठी आलेल्या मुंबईच्या यात्रेकरुंचा दुर्दैवी अपघात झालेला आहे आणि त्यामध्ये आपले काही बांधव मृत्यूमुखी पडलेले आहेत. अशा घटना घडत असतात. अशा घटना घडू नयेत याची काळजी शासनाने, समाजाने आणि सर्वांनीच घेतली पाहिजे. परंतु ही अत्यंत दुर्दैवी अशी घटना घडलेली आहे. म्हणून त्या अपघातामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या सर्व बांधवांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----

यानंतर श्री. बरवड.... . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी या ठिकाणी कै. बाबा आमटे यांना आदरांजली वाहत असताना जो उल्लेख उल्हासदादानी केला त्या साधनाताईंचा या ठिकाणी उल्लेख करणे मला गरजेचे वाटते. बाबांची कर्तबगारी, बाबांच्या कविता, बाबांचे साहित्य, त्यांनी केलेले काम, हे सर्वांना परिचित आहे. परंतु "सुमेधा" नावाचे एक पुस्तक जे साधनाताईंनी लिहिले आहे त्यामध्ये त्यांचा आणि वहिनीसाहेबांचा प्रवास कसा सुरु झाला आणि आतापर्यंत ते कसे जगले याचे फार सुंदर चित्रण केलेले आहे. ज्या संस्कृतीमध्ये आपण वाढतो त्या संस्कृतीमध्ये ही पुरुष मंडळी मोठी होत असताना घरातील पाठिंबा तर घेतात परंतु त्यांचे स्वतंत्र अस्तित्व आहे आणि त्यांनाही वेगळ्या पध्दतीने जगण्याचा अधिकार आहे आणि त्या पध्दतीने त्यांना जगू दिले पाहिजे हा विचार बऱ्याच वेळा राजकारणी आणि समाजकारणी विसरुन जातात. परंतु बाबांच्या बाबतीत या ठिकाणी असे दिसते की, जसे ज्योतिबांनी सावित्रीला उभे राहू दिले एवढेच नव्हे तर उभे राहण्यासाठी मदत केली याच पध्दतीने या दोघांचाही प्रवास झालेला आहे. बाबांनी सुध्दा वहिनी साहेबांना स्वत:ला अत्यंत चांगल्या पध्दतीने जगू दिले. बाबांचा देवावर विश्वास नव्हता. वहिनीसाहेबांचा देवावर विश्वास होता. वहिनीसाहेब देवाची पूजा केल्याशिवाय पाणीही घेत नसत. परंतु कितीही तास वहिनीसाहेबांनी जरी पूजा केली तरी बाबांनी त्यामध्ये कधी हस्तक्षेप केला नाही. पण तुम्ही देवाची पूजा करा असा आग्रह जेव्हा जेव्हा वहिनींनी बाबांना केला त्यावेळेला बाबांनी त्यांना असा प्रश्न विचारला की, या समाजामध्ये एक भीक मागतो आहे, एक उपाशी आहे, एक कुष्ठरोगी आहे आणि एक समर्थ माणूस आहे, याच्याकडे काहीच नाही, त्याच्याकडे सगळे आहे, हा फरक तुझ्या देवाने कशासाठी बरे केला असेल ? तरी सुध्दा तुला आवडत असेल ते तू कर, मला जे आवडते ते मी करीन. वहिनीसाहेबांना त्यांनी कोठलाही हस्तक्षेप केला नाही. मला आश्चर्य वाटते. कोकणातल्या एका सामान्य कुटुंबातून आलेली ही मुलगी. त्यांचे लग्न जुळवून झालेले होते. हा विवाह एकमेकांच्या पसंतीचा नव्हता. मी ही सगळी वहिनीसाहेबांच्या पुस्तकातील उदाहरणे देत आहे. त्यावेळी बाबांनी वहिनीसाहेबांना हा प्रश्न विचारला की, मी असा फकीर आहे, मी असा वेडा माणूस आहे, माझे देशावर प्रेम आहे, मी देशासाठी आणि समाजासाठी जगणार आहे, ही अशी आग तुला चालेल का ? त्यावेळी त्याबाबत काय उत्तर द्यावयाचे हे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ......

वहिनीसाहेबांना सुचले असेल का ? त्यांनी फक्त हसून मुकसंमती दिली. आपले आईवडील करत आहेत ना आणि हा एवढा धीट तेज:पूंज सूर्य असा प्रश्न आपल्याला विचारत आहे म्हणजे निश्चितपणे हा कोणी तरी चांगला मोठा माणूस असला पाहिजे, ही भावना त्या माऊलीच्या मनामध्ये निर्माण झाली आणि तेव्हापासून त्या दोघांचा प्रवास सुरु झाला. तो प्रवास साधा नव्हता. त्यातील एक प्रसंग मला आठवतो. बाबांच्या मनामध्ये असे आले की, कुष्ठरोग्यांसाठी आम्ही काही तरी करावयास पाहिजे. पण कोणीही कुष्ठरोगी त्यांच्या जवळ यायला भीत असत. कारण कुष्ठरोग्यांविषयी तिरस्कार हा समाजातील कुटुंबात सुध्दा निर्माण केला जातो. बाहेरचा तर प्रश्नच नाही. बाबा कुष्ठरोग्यांना भेटत असत आणि कुष्ठरोगी जवळ येत नसत. त्यावेळेला एका झाडाखाली बसलेल्या दोन कुष्ठरोग्यांच्या जवळ जाऊन एक एक करुन ज्यांवेळी बाबांनी पाच सहा कुष्ठरोगी सुरुवातीला जमा केले त्यावेळेला वहिनींना सोबत घेऊन त्या कुष्ठरोग्यांच्या पायामध्ये, हातामध्ये पडलेल्या अळ्या त्यांनी काढल्या. त्यांना ड्रेसींग केले. औषधपाणी केले आणि मग त्या कुष्ठरोग्यांचा विश्वास पटला की, हा माणूस मागच्यासाठी आहे. माणूस घडत असताना जगण्याची उमेद संपणे, आयुष्यामध्ये निराशा निर्माण होणे, त्याच्यातून त्याला जगण्याची उमेद देणे, साधा धडधाकट माणूस सुध्दा आत्महत्या करतो, पण या कुष्ठरोग्यांच्या बाबतीत, ज्यांना कुटुंबाने नाकारले, ज्यांना समाजाने नाकारले, ज्याला संपूर्ण जगाने नाकारले, त्यांना फक्त जगण्याचीच उमेद त्यांनी दिली असे नाही तर त्या माणसांच्या हातातून त्यांनी एक निर्मेक निर्माण केला. तो निर्मेक असा निर्माण केला, ज्यावेळी आपण आनंदवन पाहतो त्यावेळी हाताला बोटे नसलेली आणि पायाला आंगठे नसलेली माणसे आपल्या कापड विणताना दिसत आहेत. त्या ठिकाणी ग्रिटींग कार्ड तयार करताना दिसत आहेत. हजारो प्रकारच्या वस्तू तयार करताना दिसत आहेत आणि त्या वस्तू जगाच्या पाठीवर जात आहेत. फक्त जगणे नव्हे तर समाजाला गरज असलेल्या वस्तू तयार करणे आणि विकास प्रक्रियेमध्ये एका कुष्ठरोग्याला आणणे, आत्मविश्वासाने फक्त पुरुषालाच नाही तर स्त्रियांना सुध्दा यामध्ये आणण्याचे कार्य बाबांनी केले. या सर्वांना, मग तो कोणत्याही जातीचा असो, कोणत्याही पंथाचा असो, आनंदवनातील कुष्ठरोग्यांकडे जर आपण पाहिले तर बाबांनी कधी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/ KTG/

श्रीमती उषाताई दराडे .....

त्याची जात पाहिली नाही. तो माणूस आहे हाच विचार त्यांनी केला. वहिनीसाहेबांनी मूर्तीमध्ये देव पाहिला, आणि बाबांनी माणसामध्ये देव पाहिला. ही जी वारकरी सांप्रदायाची परंपरा आपल्या महाराष्ट्राला आहे ती जगण्याचे खरे काम बाबांनी केले. बाबांना चांगली माणसे जवळ करण्याचा व्यासंग होता. या ठिकाणी त्यांचे एक लाडके पुत्र आपले माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील बसलेले आहेत. आबांवर बाबांचा फार जीव होता. पण समाजातील चांगल्या माणसांकडून माझ्या या कुष्ठरोग्यांना काही मिळते काय याचे वेड त्यांना असावयाचे ? आपल्याला एकच प्रसंग सांगेन. त्यांच्या मुलाने एक ऑर्केस्ट्रा उभा केला आहे. आमच्या मुलांनी डॉक्टर व्हावे आणि परदेशात जावे हे वेड असते. उषाताई तुमचा मुलगा काय करतो असे विचारल्यानंतर बरेच राजकारणी असे सांगतात की, माझा मुलगा लंडनला आहे, माझा मुलगा अमेरिकेला आहे. बाबांना जर प्रश्न वियारला की बाबा तुमचा मुलगा काय करतो तर ते सांगतात माझा मुलगा हेमलकसा येथे सेवा करतो. त्या बाबांच्या ऑर्केस्ट्रामध्ये काहीमुली होत्या. त्यांना डोळे नव्हते. त्यांनी डॉ. लहाने यांना निरोप देऊन त्यांच्या डोळ्यांचे ऑपरेशन केल्यानंतर आज त्या मुली सुदर डान्स करतात, कथ्थक करतात. अत्यंत चांगल्या प्रकारचा अविष्कार त्या ठिकाणी उभा केला आहे. म्हणून त्यांच्या विषयी मला या ठिकाणी दोन मिनिटे बोलण्याची परवानगी द्यावी.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे.....

समाजामध्ये अशी माणसे फार कमी असल्यामुळे, रहावत नाही म्हणून मी एक कविता मी यानिमित्ताने वाचून दाखविणार आहे. श्री.नामदेव ढसाळ यांनी लिहिलेली एक कविता बाबांसाठीच लिहिली आहे असे माझे मत आहे. त्या कवितेत त्यांनी असे म्हटले आहे की, 'ती पहा रे ती पहा, मातीची अस्मिता आभाळभर झाली आहे, रक्ताने पेटलेल्या अगणित सूर्यांनो,....' श्री.नामदेव ढसाळ हे बाबांसारख्या सूर्याला आव्हान देत आहेत. तोच हा सूर्य म्हणजे बाबा. त्यानंतर वहिनीसाहेब व बाबांसाठी एक कविता त्यांनी लिहिलेली आहे, ती वाचून मी माझे मनोगत पूर्ण करणार आहे. प्रशांत वैद्य नावाच्या कवीच्या कवितेच्या चार ओळी एका वर्तमानपत्रात मला वाचावयास मिळाल्या होत्या. त्या कवितेत असे म्हटलेले आहे की, 'उन्हाकडे न मागते कुणीच सावली कधी, कशास ठेवतेस या उन्हास आसपास तू ?' हा प्रश्न बाबा वहिनीला निश्चितच विचारत असतील. बाबा एक साहित्यिक होते. त्यांनी लिहिलेली 'ज्वाला आणि फुले' ही कविता 11 पानांची आहे. ही कविता 4-4 वेळा वाचली तरी समजत नाही. इतकी प्रगल्भता त्यांच्यात होती. अशा या थोर समाजसेवकाला मी आदरांजली वाहते.

कै.रामराव ज्ञानोबा जगताप-आवरगांवकरसाहेब हे आमच्या जिल्हयातील होते. धारुर तालुक्यातील आवरगाव नावाच्या एका छोटया गावातील ते होते. गोवा मुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, हैद्राबाद मुक्ती संग्राम या चळवळींमध्ये त्यांनी भाग घेतला होता. सभापती महोदय, मला एका गोष्टीचा याठिकाणी उल्लेख करावयाचा आहे. कै.आवरगांवकरसाहेब हे माझ्या कुटुंबातील होते. त्याचे कारण असे की, हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या त्या सशस्त्र 11 जणांच्या तुकडीमध्ये माझे वडील श्री.डी.एम.ठोंबरे आणि कै.आवरगांवकरसाहेब यांनी एकत्र काम केलेले आहे. आवरगावचा कॅम्प, खेडयाचा कॅम्प याच्या सशस्त्र तुकडीमध्ये माझे वडील आणि ते एकत्र असताना 200 सैनिकांची जी तुकडी होती, त्या तुकडीचा भटारखाना, त्यांच्या जेवणाचे काम माझ्या आजीने म्हणजे श्रीमती रेणुका ठोंबरे यांनी सांभाळले होते. म्हणून कै.आवरगांवकर हे मला ज्या ज्यावेळी कोणत्याही कार्यक्रमात भेटत असत त्यावेळी त्यांना रहावत नसे, त्या भावनेतून ते प्रत्येकाला सांगत असत की, ही माझी मुलगी बरं का ? ही माझ्या ठोंबरेची पोरगी, ही माझ्या

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे....

रेणुकाबाईची नात. म्हणून त्यांचे आणि आमचे कौटुंबिक नाते होते असे मी म्हटले आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामातील खडकीच्या दरोडयामध्ये माझे वडील मारले गेले असते, परंतु माझ्या वडिलांना कै.आवरगांवकर यांनी वाचविले होते. त्यांनी वडिलांना वाचविल्यामुळे मी आज तुमच्यासमोर आहे. त्यांच्याबद्दल मला खूप आत्मियता आहेच. त्यांच्या विषयी मी अधिक बोलू शकणार नाही. कारण मला माझ्या गेलेल्या वडिलांची, आईची आणि आजीची आठवण आलेली आहे. त्यांच्या विषयी मी मन:पूर्वक आदरांजली व्यक्त करीत आहे.

कै.य.दि.फडके यांच्याबद्दल मी एवढेच सांगेन की, एवढया उंचीचे साहित्य निर्माण करणारे साहित्यिक हे नेहमीच समाजाला दिशा देत असतात. ते समीक्षक होते, संशोधक होते. त्यांनी चरित्रग्रंथ लिहिले आहेत. सांस्कृतिक क्षेत्रासाठी त्यांनी लिखाण केलेले आहे. आपल्या लेखनातून समाजाचा उत्कृष्ट चेहरा समाजासमोर ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. कै.य.दि.फडके यांनाही मी आदरांजली वाहते.

त्याचप्रमाणे वणी येथे घडलेली घटना अतिशय दु:खद आहे. अशाप्रकारची घटना यापुढे घडता कामा नये. त्या घटनेमध्ये मृत्यू पावलेल्या यात्रेकरुंना आदरांजली वाहून मी याठिकाणी थांबते.

----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

**सभापती** : सभागृहाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी थोर समाजसेवक कै.बाबा आमटे, श्री.रामराव ज्ञानोबा जगताप-आवरगांवकर आणि ज्येष्ठ साहित्यिक श्री.य.दि.फडके यांच्या दु:खद निधनाबद्दल या सदनामध्ये जो प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावावर माननीय विरोधी पक्ष नेते, सर्व गट नेते आणि दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. या बाबतीतील मी देखील माझ्या भावना याठिकाणी मांडतो.

पद्मविभूषण कै.बाबा आमटे या विभूतीचा जगमान्य अशाप्रकारचे भारतीय एक अत्यंत आदर्श व्यक्तिमत्व असा उल्लेख करता येईल. कै.बाबा आमटे यांनी अगदी तरुण वयामध्ये स्वातंत्र्य लढयामध्ये प्रकर्षाने भाग घेतला. ब्रिटिश राजवटीच्या श्रृंखला तुटाव्यात यासाठी झालेल्या लढयांमध्ये ते अग्रेसर राहिले. कै.बाबा आमटे यांनी काही काळ वकिली केली होती. परंतु स्वातंत्र्योत्तर काळामध्ये जो उपेक्षित समाज आहे, अशा सामान्य समाजाची सेवा करण्याचे व्रत त्यांनी स्वीकारले. ज्यांना दुर्दैवाने समाजात निसर्गही बाजूला ठेवतो, ज्यांना तुम्ही आणि आम्ही बाजूला ठेवत होतो अशा कुष्ठरोगी आपल्याच बांधवांची सेवा करण्याच्यादृष्टीने 1950-51 च्या दरम्यान एक अत्यंत आदर्श पध्दतीचा ध्येयवाद डोळयासमोर ठेवला. उपेक्षितांची सेवा करण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

(सभापती.....

देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या कानाकोप-यात कुष्ठरोगासारख्या असाध्य रोगाने पीडित असलेल्यांची सेवा करणारी जी काही महत्वाची व्यक्तिमत्वे आहेत त्यामध्ये बाबा आमटे यांचे नाव जगामध्ये आणि अनेक राष्ट्रांमध्ये यापूर्वीही सातत्याने घेतले जात होते व या पुढच्या काळामध्येही ते नाव सातत्याने टिकणार आहे आणि वाढणार आहे. बाबा आमटे यांनी विविध क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याचा सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. मी एवढेच सांगेन की, समाज जीवनामध्ये जे उपेक्षित, दुर्दैवी आणि दुःखी आहेत अशा सामान्य माणसांची सेवा करणे ही ख-या अर्थाने ईश्वरी सेवा आहे. ही सेवा बाबा आमटे यांनी महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यामध्ये गेल्या 50-60 वर्षाच्या कालखंडात केली. या उपेक्षित माणसांकरिता आपले खडतर जीवन जगत असतना त्यांनी अनेक पध्दतीचे आदर्श निर्माण केले. "भारत जोडो" यात्रांचे आयोजन करुन त्यानी केलेल्या राष्ट्रीय एकात्मता व जनजागृतीच्या कार्याचा या सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. राष्ट्रीय एकात्मतेचा त्यांनी केलेला पुरस्कार या पुढच्या काळातही जेव्हा जेव्हा बाबा आमटे यांचे नाव घेतले जाईल त्यावेळी डोळ्यासमोर येईल. या देशातील सर्व जाती-धर्म आणि भाषिक समाजामध्ये अभिसरण होऊन संपूर्ण भारत एकात्मिकतेने जोडला गेला पाहिजे अशा प्रकारचा जो संदेश त्यांनी सातत्याने दिला तो या पुढच्या काळात तुम्ही आम्ही आचरणात आणणे हीच त्यांना ख-या अर्थाने श्रध्दांजली ठरेल असे मला वाटते.

कै. रामराव ज्ञानोबा जगताप-आवरगांवकर, माजी वि.प.स. हे बीड जिल्ह्यातील एक व्यक्तिमत्व. त्यांनी सुरुवातीला कम्युनिस्ट पक्षामध्ये काम केले. नंतरच्या काळात त्यांनी काँग्रेसमध्ये काम केले. अशा पध्दतीचे काम करीत असताना 1952मध्ये त्यांनी हैद्राबाद असेम्ब्लीमध्ये आमदार म्हणून काम केले. त्यानंतरच्या काळात 1956मध्ये जेव्हा मुंबई हे द्विभाषिक राज्य होते त्यावेळी देखील त्यांनी आमदार म्हणून काम केले. 1964मध्ये त्यांनी विधान परिषदचे सदस्य म्हणून काम केले. जिल्हा लोकल बोर्ड असेल किंवा इतर अनेक माध्यमे असतील, त्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्यांची सेवा केली. राज्यसभा सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले. कै. रामराव ज्ञानोबा जगताप-आवरगांवकर यांनी ख-या अर्थाने मराठवाडयातील सर्वसामान्यांचे नेतृत्व केले.

कै. य.दि.फडके हे एक आगळे वेगळे व्यक्तिमत्व यादृष्टीने संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्याकडे बघतो. जवळ जवळ 70 वेगवेगळे साहित्य प्रकार त्यांनी लिहिले. त्यामध्ये काही चरित्रे आहेत.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती......

अन्य विविध प्रकारचे लिखाण त्यानी केले. कुशाग्र बुध्दीचे, परखड विचारांचे, ध्येयवादी आणि समाजाला अचूक पध्दतीचे मागदर्शन करणारे हे व्यक्तिमत्व. त्यांच्या लेखनातून महाराष्ट्राला अचूक आणि योग्य मार्गदर्शन झाले. अत्यंत उत्कृष्ट पध्दतीचे लेखन करणारा साहित्यिक, शिक्षक, प्राध्यापक अशा पध्दतीने परिचित असलेले हे व्यक्तिमत्व आपल्यातून गेलेले आहे. मी त्यांना श्रध्दांजली वाहतो.

.....नंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

वणी, जि.नाशिक याठिकाणी बसला झालेला जो अपघात होता त्या अपघाताच्या अनुषंगाने माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आणि माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी अपघातामध्ये मृत्युमुखी पडलेल्या लोकांना श्रध्दांजली वाहिली. तसेच या अनुषंगाने काही सूचनाही केल्या. यात्रेला जाणाऱ्या सर्वसामान्यांचे जीवन सुरक्षित रहावे याची काळजी शासनाने घेणे आवश्यक आहे. मला खात्री आहे की, माननीय उपमुख्यमंत्री याची नोंद घेतील. सर्व दिवंगत व्यक्तिंना श्रध्दांजली वाहण्याकरिता सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियाकडे पाठविण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 11 मार्च, 2008 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 1 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 11 मार्च, 2008 च्या दुपारी

12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही